७० वर्ष

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. ०६ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews


संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०४३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## धानोरकर गटाचा महापौर असेल तर समर्थन देणार नाही

चंद्रपूर (दै. संध्या) : चंद्रपूरमध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या भूमिकेमुळं प्रदेश काँग्रेसची डोकेदुखी वाढली आहे. चंद्रपूरच्या स्थानिक उबाठा पदाधिकाऱ्यांनी अशी अट टाकली आहे, की प्रतिभा धानोरकर गटाचा महापौर असेल तर आम्ही काँग्रेसला समर्थन देणार नाही. काँग्रेसकडून धानोरकर गटाच्या चार नगरसेवकांनी महापौर पदासाठी अर्ज भरला आहे. त्यामुळे चंद्रपूरच्या महापौर, उपमहापौर पदाला घेऊन काँग्रेसचा अंतर्गत संघर्ष संपलेला दिसत असला तरी काँग्रेसला आपला महापौर बनू शकेल का? हा प्रश्न अजूनही कायम आहे. सध्या काँग्रेसकडे स्वतःचे 27 नगरसेवक आहेत. स्थानिक विकास आघाडीचे 3 नगरसेवक, एमएमएमचा 1 व बसपा 1 असे मिळून 32 नगरसेवक असल्याचा दावा आहे. मात्र उबाठा व स्थानिक विकास आघाडी ही स्वतः महापौर पदाच्या शर्यतीत आहे. काँग्रेस हाय कमांडने काँग्रेसच्या प्रदेश नेतृत्वाला यातून मार्ग काढण्याची जबाबदारी सोपवली असून प्रदेश नेतृत्वाची भिस्त विजय वडेट्टीवार यांच्यावर आहे.

# काँग्रेस, मोदी की कब्र खोदने के सपने देखती है

## राज्यसभेतून मोदींचा घणाघात, नेहरू, इंदिरा गांधींचाही उल्लेख

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर पंतप्रधान नरेंद्र मोदींचं भाषण आज संसदेत झालं आहे. लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारत-चीन सीमारेषेवरील डोकलामचा विषय घेऊन सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारला. त्यावरुन, लोकसभा सभागृहात चांगलीच खडाजंगी झाल्याचं पाहायला मिळालं होतं. त्यामुळे, लोकसभेत कामकाज स्थगित करण्यात आलं असून दोन दिवसांपूर्वीच काही खासदारांचे निलंबनही करण्यात आलं आहे. आता, राज्यसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदीचं भाषण सुरू असून मोदींनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. तर, मोदींचे भाषण सुरू होताच विरोधकांकडून जोरदार हल्लाबोल करण्यात आला.

मोदींचे भाषण सुरू होताच राज्यसभेत विरोधी पक्षाच्या खासदारांनी तानाशाही नही चलेगी अशी घोषणाबाजी केली. त्यावर, मोदींनी काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे यांना टोला लगावला. आदरणीय खर्गेची तुमचं वय लक्षात घेता तुम्ही खाली बसूनच नारेबाजी करावी, इथे तरुण खासदारही आहेत, असे म्हणत खर्गेंना टोमणा लगावला. त्यानंतर, विरोधकांनी राज्यसभेतूनही वॉकआऊट केल्याचं पाहायला मिळालं. त्यानंतर, मोदींनी काँग्रेसवर घणाघाती टीका केली. 'मोहब्बत की दुकान खोलने वाले मोदी तेरी कब्र खुदेगी के नारे लगा रहे हैं. ये कौन सी मोहब्बत की दुकान है, जो देश के ही किसी नागरिक के कब्र खोदने के सपने देख रही है. ये कौन से संविधान से उन्होंने सीखा है. क्या ये मानवता का अपमान नहीं है, लेकिन उन्हें इसका कोई खेद नहीं है. इसके बाद बयान देगा कि राज्यसभा में पीएम मोदी रो रहा था. किस प्रकार के संस्कारों से पले-बढ़े लोग हैं ये. काँग्रेस मोदी की कब्र खोदने के सपने देखती है, असेही मोदींनी म्हटले. आपला देश आज वेगाने पुढे जात असून आपण थांबायचं नाही, मागे वळून पाहायचं नाही. जेव्हा भारत स्वतंत्र झाला तेव्हा जगातील 6 व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होता. मात्र, काँग्रेसने देशाची अर्थव्यवस्था 10 व्या क्रमांकावर नेऊन ठेवली होती. पण, विश्वकल्याणाचा मार्ग स्वीकारत आपण भूमिका बजावत आहोत. आज जागतिक स्तरावर भारत दक्षिण विश्वाची आवाज बनला आहे. जग नव्या दिशेने पुढे जात असून भारत देश पार्टनर आहे. काँग्रेसमुळे देशाची जी प्रतिमा बनली होती, ती प्रतिमा पुसण्यातच आपली अधिक मेहनत खर्ची होत असल्याचे मोदींनी म्हटले. लाल किल्ल्यावरुन काँग्रेसच्या पंतप्रधानांची भाषणं ऐका, त्यातून ना कुठला विचार दिसेल, ना दृष्टी ना दृष्टीकोन असे म्हणत मोदींनी राज्यसभेतून पुन्हा काँग्रेसच्या युपीए सरकारवर निशाणा साधला.

भारत आणि अमेरिका यांच्यात झालेल्या ट्रेड डीलवरुनही मोदींनी भारताची जगभरात वाढत असलेली ताकद सांगितली. देशातील तरुणाईला या ट्रेड कराराचा सर्वाधिक लाभ होणार आहे.

### पंडित नेहरुंचा उल्लेख

स्व. इंदिरा गांधींनी ज्या प्लॅनिंग कमिशनवर सडकून टीका केली, त्या प्लॅनिंग कमिशनचे जन्मदाता हे त्यांचेच वडिल पंडित जवाहरलाल नेहरू होते. सन 2014 पर्यंत सर्वजण प्लॅनिंग कमिशन पाहात होते, पण त्याच्या सुधारणेसाठी कुणीही प्रयत्न केले नाहीत. मात्र, 2014 मध्ये आम्हाला संधी मिळाली अन् आम्ही प्लॅनिंग कमिशन बरखास्त करत नीति आयोगाची स्थापना केली.

# गृहनिर्माणासह पायाभूत विकासात कॅनडाचे सहकार्य राज्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी कॅनडाची भागीदारी



**मुंबई (दै. संध्या)**

महाराष्ट्राच्या विकासात योगदान देण्यासाठी कॅनडा उत्सुक आहे.कॅनडियन इन्फ्रास्ट्रक्चर बँकेच्या सहभागातून गृहनिर्माण व पायाभूत क्षेत्रातील दोन महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणुकीद्वारे या सहकार्याची सुरुवात केली जाईल. कॅनडाच्या वित्तीय व तांत्रिक सहकार्यामुळे महाराष्ट्रातील पायाभूत विकासाला नवी दिशा मिळेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानी कॅनडा इन्फ्रास्ट्रक्चर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सेबास्टियन यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधण्यात आला. यावेळी वित्त व नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंगल, मुख्यमंत्र्यांचे प्रमुख आर्थिक व गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, अभिनेता अजिंक्य देव आणि अतुल गुप्ता उपस्थित होते.

कॅनडा इन्फ्रास्ट्रक्चर बँकेच्या गुंतवणुकीसंदर्भात आठ प्रमुख मुद्द्यांवर आधारित सविस्तर सादरीकरण यावेळी करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात विविध पायाभूत विकास प्रकल्प सुरू आहेत. यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचा लाभ घेण्यात येणार आहे. म्हाडा तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) महत्त्वाच्या उपक्रमांसाठी हे सहकार्य उपयुक्त ठरेल. प्राथमिक टप्प्यात दोन प्रकल्पांची निवड करून भागीदारीच्या दृष्टीने चर्चा केली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी डॉ. सेबास्टियन यांनी महाराष्ट्रातील पायाभूत विकासासाठी कॅनडाच्या वित्तपुरवठा साखळीच्या माध्यमातून विविध तांत्रिक व आर्थिक उपाययोजनांची एकत्रित अंमलबजावणी करण्यात येईल, तसेच आवश्यकतेनुसार जी-20 ऑफटेकसह उच्च दर्जाची 'ट्रिपल-ए' रेटेड विश्वासार्हता प्रदान करण्यात येईल, अशी वचनबद्धता व्यक्त केली.

स्थानिक चलनात गुंतवणूक व यजमान देशातच निधीची पुनर्गुंतवणूक करण्याची तरतूद असून, त्यामुळे निधी परत पाठवण्याचा धोका राहणार नाही. हेजिंग किंवा स्वॅप प्रणालीची आवश्यकता भासणार नाही. सुरक्षित, एन्क्रिप्टेड वेब-आधारित व ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे कॅनडाशी संबंधित प्रकल्पांसाठी उद्योग, संसाधने, नेटवर्क आणि राज्य शासनाच्या प्रणालींशी जोडलेले सर्वसमावेशक 'वन-स्टॉप सोल्यूशन' उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### टर्न-की प्रकल्प अंमलबजावणी

राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रकल्पांसाठी निधी उपलब्धता, दीर्घकालीन परतफेडीची मुदत तसेच विमा संरक्षणाद्वारे जोखीम कमी करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. प्रमुख प्रकल्प व्यवस्थापन, कार्यान्वयन व देखरेख प्रक्रियांमध्ये कॅनडाचे तांत्रिक सहकार्य लाभणार असून, स्थानिक भागीदारांच्या सहभागातून प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येतील.


# जिल्हा परिषद - पंचायत समिती निवडणुका - २०२६


मतदार बंधू- भगिनींनो,
आपलं

एक मत जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी (गट)
आणि
एक मत पंचायत समिती निर्वाचक गणासाठी (गण)

अवश्य द्या!

मतदान यंत्रावरील (बीयू) मतपत्रिकांचे रंग

जि. प. गटाची मतपत्रिका असेल पांढऱ्या रंगाची



पं. स. गणाची मतपत्रिका असेल गुलाबी रंगाची

(उमेदवारांची संख्या जास्त असल्यास आवश्यकते नुसार एकपेक्षा अधिक मतदान यंत्रांचा (बीयू) वापर करण्यात येतो)

मतदान दि. ०७ फेब्रुवारी २०२६ | वेळ - सकाळी ७:३० ते सायं. ५. ३०

मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी 'मताधिकार' मोबाईल ॲप आणि https://mahasecvoterlist.in या संकेतस्थळाची सुविधा

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

MaharashtraSEC

कर मतदान...
सांगतंय संविधान!

## संपादकीय

# चिनी जुळ्या पांडांना निरोप देताना जपान भावूक!

जपानमधील पांडाप्रेमींसाठी गेले काही दिवस अतिशय भावनाप्रधान ठरले.. टोक्योच्या उएनो प्राणिसंग्रहालयात असलेले शेवटचे दोन जुळे पांडा शाओ शाओ आणि लेई लेई नुकतेच चीनला परत पाठविण्यात आले. कारण या पांडांवर चीनचा मालकी हक्क आहे. जपानच्या प्राणिसंग्रहालयात त्यांना शेवटचं सार्वजनिक दर्शन देण्यात आलं. पांडाच्या या जोडीला अखेरचं पाहण्यासाठी हजारो लोकांनी गर्दी केली होती. प्रचंड गर्दी झाल्यानं प्राणिसंग्रहालयानं तिथे भेट देणाऱ्या प्रत्येकाला फक्त एक मिनिटाचा वेळ दिला होता! तरीही लोक पांडा-थीमची खेळणी घेऊन तिथे आले होते, त्यांच्या नावानं ते हाका मारत होते आणि मोबाईलवर फोटो-व्हिडीओ काढत होते. अनेक लोकांना तिकीट मिळालं नव्हतं, तरीही ते प्राणिसंग्रहालयात आले होते. कारण फक्त एकच.. हे पांडा आपल्याला आता पुन्हा पाहायला मिळणार नाहीत आणि त्यांच्या या निरोपाचे साक्षीदार व्हायचं म्हणून.. हे पांडा गेल्यानंतर जवळपास ५०वर्षांत पहिल्यांदाच जपान पांडाविना राहणार आहे. त्यांच्या निरोपामागे जपान आणि चीनमधील बिघडलेले संबंध कारणीभूत मानले जात आहेत. अलीकडच्या महिन्यांत टोक्यो आणि बीजिंगमधील संबंधांमध्ये तणाव वाढलाय. 'तैवानवर चीननं काही कारवाई केल्यास जपान हस्तक्षेप करू शकतो', असं वक्तव्य जपानचे पंतप्रधान साने ताकाइची यांनी नुकतंच केलं होतं. यांच्या त्या वक्तव्यामुळे चीन जपानवर नाराज आहे. टोक्यो महानगर प्रशासनानं नवीन पांडा पाठविण्याची विनंती करूनही चीननं स्पष्ट केलं होतं की, सध्या उएनो प्राणिसंग्रहालयात पांडा पाठविण्याची कोणतीही योजना नाही. चीनच्या सरकारी वृत्तपत्र 'बीजिंग डेली'मध्ये एका तज्ज्ञाच्या हवाल्यानं म्हटलं आहे की, तणाव कायम राहिला तर भविष्यात जपानमध्ये पांडा दिसणारच नाहीत! शाओ शाओ आणि लेई लेईचा जन्म २०२१ मध्ये उएनो प्राणिसंग्रहालयात झाला आहे. चीन इतर देशांना पांडा भाड्यानं देतो, पण त्यांचा मालकी हक्क स्वतःकडेच ठेवतो, परदेशात जन्मलेल्या पिल्लांवरही त्यांचाच हक्क असतो. चीननं १९७२ मध्ये पहिल्यांदा जपानला पांडा पाठवले होते. दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंध सामान्य करण्यासाठीचं ते प्रतीक होतं. हे पांडा लवकरच जपानमध्ये प्रचंड लोकप्रिय झाले. पांडा दीर्घकाळापासून चीनच्या कूटनीतीचा भाग राहिले आहेत. १९७०च्या दशकात चीननं अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन आणि जर्मनीसारख्या देशांनाही पांडा भेट म्हणून दिले होते. १९८०नंतर चीननं गिफ्टऐवजी 'लीज प्रणाली' सुरू केली. जंगलात राहणारे जायंट पांडा चीनबाहेर जगातील कुठल्याही देशात सापडत नाहीत. पांडा दिवसाला १० ते १४ किलोपर्यंत बांबू खातात. त्यामुळे जिथं वर्षभर बांबू उपलब्ध असतो, तिथंच पांडा राहू शकतात. पांडा जपानसाठी फक्त भावनिक प्रश्न नाही, त्यांच्यासाठी ती आर्थिक संपत्तीही आहे. उएनो प्राणिसंग्रहालयात पांडा नसतील तर जपानला दरवर्षी किमान ८,५०० कोटी रुपयांचं आर्थिक नुकसान होऊ शकतं. हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, कॅफे आणि स्मरणिका दुकानांनाही याची झळ पोहोचेल. ही परिस्थिती कायम राहिली, तर एकूण नुकसान २० ते ५० हजार कोटींपर्यंत जाऊ शकतं.



## संस्कृत सुभाषित

अमित्रो मित्रता याति मित्रं चापि प्रदुष्यति सामर्थ्य
योगात्कार्याणामनित्या वै सदा गति ॥
(शांतीपर्व, अध्याय १३८, १३, महाभारत)

अर्थ : कार्याच्या महत्त्वाच्या मानाने शत्रूही मित्र होतात व मित्रही शत्रू होतात. कारण कोणतीही परिस्थिती कायमची नसते.

## गुरु वचन

### एका लाकूडतोड्याची गोष्ट

आपण आपल्या लहानपणी ही गोष्ट ऐकलीच असेल. एक लाकूडतोड्या असतो. तो जंगलात एका झाडावर चढून लाकडे तोडत असतो. अचानक त्याच्या हातातून त्याची कुऱ्हाड झाडाखालच्या नदीत कोसळते आणि तो धाय मोकलून रडायला लागतो.

त्याच्याकडे नवी कुऱ्हाड घ्यायला मुळीच पैसे नसताना आणि त्याच्या कुटुंबाचे पोट त्याच्या या कुऱ्हाडीवरच चालत असते. तो झाडे तोडून लाकडं विकून पैसे जमवत असतो.

हे सारं वनातल्या देवाने पाहिलं असते. तो त्या लाकूडतोड्याची परीक्षा घेण्यासाठी रूप बदलून तेथे येतो आणि त्याला रडण्याचे कारण विचारतो. लाकूडतोड्या त्याला झालेला सगळा प्रकार सांगतो आणि त्याला कुऱ्हाड मिळवण्यासाठी मदत करण्याचे आवाहन करतो.

देव पाण्यात उडी घेतो. आधी तो एक सोन्याची कुऱ्हाड काढतो आणि त्या लाकूडतोड्याला विचारतो ही का तुझी कुऱ्हाड? लाकूडतोड्या नाही म्हणतो. मग देव चांदीची कुऱ्हाड काढतो लाकूडतोड्या त्यालाही नाही म्हणतो. मग देव त्याची खरी कुऱ्हाड काढतो आणि विचारतो त्याला अत्यानंद होतो. तीच त्याची खरी कुऱ्हाड असते.

देव आपल्या खऱ्या रूपात येतो आणि विचारतो मी तुला आधी सोने आणि चांदीची कुऱ्हाड दिली, तरी तू त्याला नाही का म्हणालास? लाकूडतोड्या देवाला सांगतो, प्रभू माफ करा परंतु जी वस्तू माझी नाही तिला मी माझी का म्हणू? उगाच मी ती वस्तू घ्यायची आणि नंतर माझी झोप खराब करून घ्यायची याला काय अर्थ? म्हणून मी नाही म्हणालो. देव त्याच्या या उत्तरावर खूश होत त्याला त्या तीनही कुऱ्हाडी भेट देतो.

पाहा कथा किती छोटी आहे, परंतु त्यातून निघणारा अर्थ किती विशाल आहे. जर तुम्ही तुमचे काम अगदी प्रामाणिकपणे केले तर, देव आणि दैवं तुम्हाला कितीतरी पटीने अधिक देते.

म्हणून तुम्ही कोणतेही काम करत असाल तर ते अगदी प्रामाणिकपणे करा, तुम्हाला त्यातून नक्कीच यश मिळेल यात शंका नाही.

## उपदेशकथा

### अविश्वासाचं फळ

गावातल्या एका माणसाचा कुत्रा मोठा गुणी, ईमानी होता. सर्व गावाचं रक्षण करीत असे. काही कारणांनी त्या माणसाला आपला कुत्रा सावकाराला विकावा लागला. एक रात्री सावकाराच्या घरी चोर आला. पैशाची थैली घेऊन पळून जाणाऱ्या चोराला कुत्र्यानं पाठलाग करून धरले व त्याचा कडकडून चावा घेतला. दुसऱ्या दिवशी सावकाराचा धोतराचा सोगा तोंडात धरून ओढत त्यानं सावकाराला त्या पडक्या विहिरीपाशी नेलं. तिथं चोरानं पैशाची थैली टाकली होती. सावकाराला फार आनंद झाला. त्यानं कुत्र्याचं कौतुक केलं आणि त्याला त्याच्या पहिल्या धन्याकडे पाठवलं. त्याच्या गळ्यात एक चिठ्ठी लिहिली, 'हे जनावर अत्यंत ईमानी आहे. तुमचा आधार आहे. त्याला परत पाठवीत आहे.' कुत्रा घरधन्याकडे गेला. त्याला परत आलेला पाहताच धन्याच्या मनात अनेक शंका आल्या. त्याला वाटलं, 'हा ईमानी म्हणवणारा कुत्रा सावकाराचं दार सोडून माझ्याकडे कसा आला.' त्यानं कुत्र्याच्या डोक्यावर काठीनं प्रहार केला. ते जनावर मरून पडलं. पाहतो तो त्याच्या गळ्यात होती चिठ्ठी. ती वाचताच सारा उलगडा झाला. अविश्वास आणि उतावीळपणाचं फळ मिळालं.

कथा उपदेश : अविश्वास घातक ठरतो.

## पंचांग

| पंचांग | कृष्ण पक्ष |
|---|---|
| ६ फेब्रुवारी २०२५ | तिथि:पंचमी २५:१८:४९+ |
| शुक्रवार | नक्षत्र:हस्त २४:२३:३४+ |
| विक्रम संवत्– २०८२ | योग:धृति २३:३६:४१ |
| श्रावणशके संवत्– १९४७ | करण:कौलव १२:४५:२२ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | करण:तैतिल |
| अयन– उत्तरायणारंभ | २५:१८:४९+ |
| मास– माघ | सूर्य:मकर |
| ऋतु– सौर शिशिर | चन्द्र:कन्या |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकू क्र. ८५२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | 3 | | 7 | | 9 | |
| 8 | | 1 | | 2 | | 6 | | |
| 7 | 6 | | | 9 | 1 | | 4 | |
| | | 8 | 6 | | | 1 | | 3 |
| | | 9 | | | | 2 | | |
| 5 | | 7 | | | 3 | 9 | | |
| | 2 | | 4 | 8 | | | 1 | 9 |
| | | 5 | | 3 | | 4 | | 8 |
| | 8 | | 1 | | 6 | | | 5 |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. ८५१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 9 | 4 | 6 | 2 | 8 | 7 | 3 | 5 |
| 3 | 2 | 8 | 7 | 5 | 9 | 6 | 4 | 1 |
| 7 | 6 | 5 | 1 | 4 | 3 | 2 | 9 | 8 |
| 5 | 7 | 3 | 9 | 8 | 4 | 1 | 2 | 6 |
| 4 | 1 | 9 | 2 | 6 | 5 | 8 | 7 | 3 |
| 6 | 8 | 2 | 3 | 7 | 1 | 9 | 5 | 4 |
| 2 | 5 | 1 | 8 | 3 | 7 | 4 | 6 | 9 |
| 9 | 3 | 7 | 4 | 1 | 6 | 5 | 8 | 2 |
| 8 | 4 | 6 | 5 | 9 | 2 | 3 | 1 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ३३७ – ज्युलियस पहिला पोपपदी.
- १७८८ – मॅसेच्युसेटसने अमेरिकेचे संविधान मान्य केले.
- १८१९ – सर थॉमस स्टॅमफर्ड रॅफल्सने सिंगापुरची स्थापना केली.
- १८४० – वैतंगीचा तह. न्यूझीलंड राष्ट्र म्हणून अस्तित्त्वात.
- १९२२ – अकिल रॅट्टी पोप पायस अकरावा झाला.
- १९३६ – जर्मनीत गार्मिश–पार्टेनकर्केन येथे चौथे हिवाळी ऑलिंपिक खेळ सुरू.

### राष्ट्रीय

- २००७ – नागपूर जिल्ह्यातील उमरेडमध्ये आंदोलकांवर पोलिसांचा गोळीबार; १ठार, २७ जखमी

### जन्म

- १६११ – चोंग्झेन, चीनी सम्राट यांचा जन्म.
- १६६४ – मुस्तफा दुसरा, ऑट्टोमन सम्राट यांचा जन्म.
- १६६५ – ॲन, इंग्लंडची राणी यांचा जन्म.
- १६९५ – निकोलस बर्नोली, स्विस गणितज्ञ यांचा जन्म.
- १९११ – रोनाल्ड रेगन, अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.
- १९१२ – एव्हा ब्राउन, ॲडोल्फ हिटलरची सोबतीण यांचा जन्म.

### निधन

- १५९३ – ओगिमाची, जपानी सम्राट यांचे निधन.
- १६८५ – चार्ल्स दुसरा, इंग्लंडचा राजा यांचे निधन.
- १७४० – पोप क्लेमेंट बारावा यांचे निधन.
- १९५२ – जॉर्ज सहावा, इंग्लंडचा राजा यांचे निधन.
- १९८९ – चार्ल्स गुफ्फ्रोय, बर्लिनची भिंत ओलांडताना मृत्यु पत्करणारा शेवटचा माणूस यांचे निधन.
- १९९३ – आर्थर एश, अमेरिकन टेनिसपटू यांचे निधन.

## : SMS :

Janwaro ki party
me chuha 4pek
lga k talli tha,
Billi-Aj party Na hoti
to tuje kha jati,
Chuha-Chali ja
kamini nahi to
log kahege nashe
me aurat pe hath
utha diya..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.१ | १८.६ |
| अहमदनगर | २७.२ | १८.१ |
| अकोला | २९.८ | १८.७ |
| अमरावती | २८.९ | १८ |
| बीड | २९.९ | १७.८ |
| भंडारा | २९.४ | १७.५ |
| बुलढाणा | १९.६ | ९.५ |
| चंद्रपूर | ३० | १७.७ |
| चेन्नई | ३०.२ | १९.४ |
| नवी दिल्ली | १९.९ | ११.३ |
| धुळे | २९.६ | १९.१ |
| गोंदिया | २८.७ | १७.५ |
| जळगाव | २९.६ | १८.४ |
| कोल्हापूर | २८.४ | १८.३ |
| लातूर | २८.१ | १८.२ |
| मुंबई | ३१.४ | २५ |
| नागपूर | २८.९ | १७.१ |
| नांदेड | २९ | १८.८ |
| नंदूरबार | २८.३ | २०.५ |
| नाशिक | २८.२ | १७.६ |
| पुणे | २७.४ | १८.२ |
| पंढरपूर | २८.७ | १९.८ |
| सातारा | २८.६ | १७.९ |
| सांगली | २९.१ | १८.६ |
| सोलापूर | २९.१ | २०.३ |
| वर्धा | २९.८ | १७.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम आपल्या पराक्रमीवृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील.

**तुळ :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम उतावीळपणामुळे नुकसान होण्याची शक्यता.

**वृषभ :** शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा:पश्चिम स्वत:च्या विवेकाने निर्णय घेऊन कामे केल्यास यश मिळू शकेल.

**वृश्चिक :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पुर्व मतभेद, वादांना टाळण्याचा प्रयत्न करा. आर्थिक स्थिती चिंताजनक राहिल.

**मिथुन :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व व्यापारिक जबाबदारी, देणे:घेणे सीमित ठेवा. सुखद प्रवासाचे योग येतील.

**धनु :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. अडचणीवर मात कराल.

**कर्क :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा.

**मकर :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व पूर्वी केलेल्या चांगल्या कामाचे फळ आता मिळेल. जोडीदाराशी संबंधात प्रगाढता येईल.


**सिंह :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम मुलांकडून थोडा त्रास होईल, परंतू प्रयत्न केल्यास समस्या सुटू शकते.

**कुंभ :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पश्चिम आत्मविश्वास वाढीस लागेल. कामात तसेच व्यवसायात मनासारखे यश मिळेल.

**कन्या :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पुर्व कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**मीन :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. विचार पूर्वक निर्णय घेतल्याने फायदा होईल. वाईट सवयीपासून दूर रहा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८५२



**आडवे शब्द**

१. राज्यकारभाराचे प्रमुख शहर
४. प्रत्येक वर्षी
७. 'सगळा हवाला रामावर!' याअर्थी शब्दप्रयोग
१०. सुगंधी पानांची वनस्पती
१२. मराठी भाषिकांचे राज्य
१३. नासाडी, नाश
१५. पादत्राण
१७. रंगविलेले
१९. अपशकुन
२०. कोर्टातील खटला
२१. युद्ध
२३. मागील अंगण
२५. बिनवासाचे पांढरे फूल
२७. जागृत
२९. काका (इंग्रजी)
३१. चेष्टा
३२. माधुर्य
३३. विचार करणारा, सूज्ञ
३५. ग्रामीण बोलीत घटस्फोट
३७. माफी
३९. मौज, बहार
४१. पालव
४४. इतरांहून निराळा
४६. युक्ती
४८. आपटणे, टक्कर देणे
५०. सुवर्ण
५१. मजबूत, भक्कम
५३. घोंगड्या विणणारी जमात
५४. फुरसत
५५. नवरदेव
५६. लाकूड कापण्याचे हत्यार
५८. जहर
५९. आरोप
६०. आजच्या आधीचा दिवस
६१. वाकलेला, नम्र
६३. साजसज्जा करणे
६४. उत्सवाचे दिवस
७०. इंद्र दरबारातील दोन अप्सरा
७१. अतिशय आनंद
७३. कमीजबरोबरचे वस्त्र
७४अ. कोणी तरी विशेष
७५. भेळमिसळीचा उत्तर भारतीय अवतार
७६. धातूचा धागा
७७. रवाळ
७८. अव्हेरणे, संकोचापोटी नाकारणे

**उभे शब्द**

१. दास जोडल्यास लाडवाचा प्रकार
२. शेतकऱ्यांचा मित्र म्हटली जाणारी सापाची बिनविषारी जात
३. पाणी
५. चार वेदांपैकी एक
६. किंचीत छोटा
७. देश
८. भ्रमंती, सतत प्रवास करणे
९. सेनापती
११. एकसारखे, सदोदित
१४. उथळ वाटी
१६. अधाशी, लालची
१८. धुसफूस, जीवाला होणारा
२०. मोठा भाऊ
२२. मातीचा कण असला तरी हत्ती असल्याचा आभास निर्माण करणे अर्थात एखादी घटना फुगवून सांगणे याअर्थी वाक्प्रचार
२४. राज्यशकट हाकणारे मंत्रीमंडळ
२६. खिडकी
२८. थंड
२९. अंत:करण, अतील भाग
३०. निकट, जवळ
३२. साखरेची चव
३४. राग, क्रोध
३६. उन्हाळ्यात येणारे सुगंधी पांढरे फूल
३८. सन्मानाप्रित्यर्थ दिलेली अल्प रक्कम
४०. संकटातून, पेचातून सोडवणे याअर्थी वाक्प्रचार
४२. जाणे येणे
४३. स्थिती, अवस्था
४५. गीत
४६. हात, हस्त
४७. महिरप
४९. भय, भीती, शंका
५२. कोळशाची पूड
५३. नेहमी, निरंतर
५४. आकलन क्षमता
५६. मनाचा ओढा
५७. अरण्य
५९. आजूबाजूला
६०. व्यवस्था, कामाची देखरेख
६२. सर्कशीत हसविणारा
६३अ. भोजनानंतर मुखशुद्धी करणारा
६५. पुन्हा पुन्हा, फिरून फिरून
६६. विनंती
६७. हिंदीत परत
६८. संतोष, तृप्ती
६९. 'वॉशिंग मशीन' मध्ये न होणारी क्रिया
७२. मराठी मुलूखाचा पठारी भाग
७४. वेल
७४अ. चानी
७५. मुख्य दिशांची संख्या

उत्तर उद्याच्या अंकात

**जम्बो शब्दकोडे क्र. ८५१ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.कोरडा ४.पारावार ६.साय ७.पर ९.सनसनाटी १२.जावई १३.दरड १५.ललकारी १६अ.बासमती १७अ.खरोखर १८.बरबाद २०.चारा २२.राही २३.प्रकाश २५.परत २६.समास २७.हालचाल २८.सारक २९.महामार्ग ३०.रव ३१.कतरण ३३.प्रतिकारक ३४.फरार ३६.काननबाला ४१.डबा ४२.नकलाकार ४४.राजीवलोचन ४७.घसा ४८.भोज्य ४९.खार ५०.समीर ५१.सामनावीर ५३.पसा ५५.दरारा ५६.पदरमोड ५८.नरम ६०.नाश ६१.बोट ६२.कप ६३.जम ६४.समरभूमी ६६.मदतनीस ६८.रणगाडा ६९.नवनीत ७०.रया

उभे उत्तर : १.कोप २.डास ३.वास ४.पाटील ५.रजा ६.साईबाबा ७.परतीचा मार्ग ८.रड १०.नजर ११.नाल १३.दम १४.आरोही १६.काया १७.सद १७अ.खराब १८.बरकत १९.रत २१.रास २३.प्रचारक २४.कालव २५.परकर २६.समाधान २७.हानिकारक २९.मणका ३२.गेलाबाजार ३३.प्रथा ३५.रामराज्य ३७.नयन ३८.बाड ३९.पर ४०.सलोखा ४२अ.लाघवी ४३.कासार ४५.चरणारविंद ४६.ठोसा ४८.भोवरा ५०.सवड ५२.नाकाम ५४.सापट ५५.दशरथ ५७.पाप ५८.नजर ५९.रमण ६०.नाम ६२.कसर ६४.सडा ६५.मीन ६६.मत ६७.तप

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# 'AM/NS इंडिया' पहिली इंटिग्रेटेड स्टील प्रोड्यूसर

दिल्ली/मुंबई (दै. संध्या) :

- भारताच्या उभरत्या ग्रीन स्टील इकोसिस्टिम आणि डीकार्बनायझेशन रोडमॅपला कंपनीचे योगदान अधोरेखित करते
- AM/NS इंडिया आणि आर्सेलॉरमित्तल मधील लार्ज-स्केल रीन्यूएबल एनर्जी गुंतवणुकींद्वारा पाठबळ लाभलेले प्रयत्न

आर्सेलॉरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS इंडिया) झाली आहे नवीन ग्रीन स्टील टॅक्सॉनॉमीमध्ये 'मिनिस्ट्री ऑफ स्टील्स'कडून नवीन 'ग्रीन स्टील सर्टिफिकेशन' मिळालेले देशातील पहिले इंटिग्रेटेड स्टील प्रोड्यूसर. 'AM/NS इंडिया'च्या 'हॉट रोल्ड' (HR) कॉइल्स आणि शीट्सना फोर-स्टार रेटिंग मिळाले आहे आणि 'कोल्ड रोल्ड' (CR) कॉइल्स आणि शीट्सना थ्री-स्टार रेटिंग मिळाले आहे.

ऑटोमोटिव,इन्फ्रास्ट्रक्चर, डिफेन्स, कन्स्ट्रक्शन इक्विपमेंट आणि कन्ज्युमर ड्यूरेबल्स सेक्टर्ससाठी महत्वाची इन्पुट्स असलेली ही प्रॉडक्ट्स - आता सरकार प्रमाणित ग्रीन स्टीलसाठी अधिकृतपणे मान्यताप्राप्त आहेत, जी कस्टमर्सना त्यांच्या व्हॅल्यू चेन्समध्ये (or मूल्य शृंखलेमध्ये) स्कोप 3 एमिशन्स कमी करणे शक्य करतात

प्रमाणीकरणासाठीची पात्रता फिनिश्ड स्टीलच्या ($tCO_2e$/tfs) प्रति टन समतुल्य $CO_2$च्या 2.2 टन्सपेक्षा कमी पात्र गणल्या गेलेल्या थ्रेशोल्डसह (or आरंभासह) स्टील प्रॉडक्शनच्या (or उत्पादनाच्या) एमिशन्स इंटेन्सिटीवर (or उत्सर्जन तीव्रतेवर) आधारलेली आहे. ह्या थ्रेशोल्डपेक्षा (or आरंभापेक्षा) कमी एमिशन्ससह (or उत्सर्जनासह) तयार करण्यात आलेले स्टील थ्री-टियर सिस्टिम अंतर्गत: थ्री-स्टार, फोर-स्टार किंवा फाइव-स्टार ग्रीन स्टीलम्हणून रेट केले जाते.

प्रमाणीकरण मिळवण्यासाठी, AM/NS इंडियाला 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सेकंडरी स्टील टेक्नॉलॉजी' (NISST) द्वारा कठोर (or काटेकोर/कडक) तपासणीला सामोरे जावे लागले, ज्यातून कंपनीचा फ्लॅगशिप (or प्रमुख) फ्लॅट स्टील पोर्टफोलिओ ग्रीन स्टील निकषांची पूर्तता करत असल्याला पुष्टी मिळाली.

श्री. दिलिप ऊम्मेन, सीईओ, आर्सेलोमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS इंडिया), म्हणाले : " भारताच्या ग्रीन स्टील टॅक्सॉनॉमीने स्टील इंडस्ट्री आणि तिचे डीकार्बनायझेशन ह्यांच्या भावी वाटचालीसाठी सुस्पष्ट मार्ग दाखवला आहे. AM/NS इंडिया तिच्या कार्बन पाऊलखुणा कमी करण्यासाठी मोजण्यायोग्य प्रयत्नांसह लो कार्बन स्टीलचे उत्पादन करीत आहे आणि तिची नवीन रचना ह्या बांधीलकीला आणखी पाठबळ देणारी आहे. हे प्रमाणीकरण 'लो कार्बन' प्रोसेसेस आणि क्लीन एनर्जी ह्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या गुंतवणुकींच्या आधाराने ह्या वाटचालीतील आपली प्रगती प्रतिबिंबित करते. ही मान्यता 'स्मार्टर स्टील्स, ब्राइटर फ्यूचर' हे आपले ब्रँड प्रॉमिस प्रत्यक्षात देऊ करण्यावर आपण लक्ष केंद्रित करत असल्याचे दर्शवते. हा विकास स्टीलमेकर्स राष्ट्रीय हवामान उद्दिष्टांना पाठबळ देण्यामध्ये महत्वाची भूमिका देखील अधिक दृढ करीत आहे, तसेच जागतिकदृष्ट्या स्पर्धाक्षमआहे".

'AM/NS इंडिया'ची तिच्या फ्लॅट स्टील्ससाठी 'ग्रीन स्टील' सर्टिफिकेशन (or प्रमाणिकरण) सुरक्षित करण्याची क्षमता तिची संरचनात्मक 'लोअर-कार्बन' उत्पादन रूपरेखा प्रतिबिंबित करते. कंपनीच्या स्टील बनवण्याच्या क्षमतेपैकी सुमारे 65% ही नैसर्गिक वायू वापरून 'डायरेक्ट रीड्यूस्ड आयर्न' (DRI) रूट वर आधारित आहे, जी 'कोल-बेस्ड प्रोसेसेस' वरील अवलंबित्व लक्षणीय पातळीवर कमी करते.ह्यामुळे 2015 पासून कार्बन डाय ऑक्साइड एमिशन्स इंटेन्सिटी (or उत्सर्जन तीव्रते).3 मध्ये 35% पेक्षा अधिक घट होण्याला पाठबळ लाभले आहे.

कुर्नुल,आंध्र प्रदेश येथील 'AM ग्रीन एनर्जी' द्वारा विकसित सुमारे 1 GW हायब्रिड रीन्यूएबल एनर्जी प्रोजेक्टकडून पुरवल्या जाणाऱ्या पॉवरसह,रीन्यूएबल एनर्जीच्या इंटिग्रेशन द्वारे (or संकलनाद्वारे) कंपनीची एमिशन्स (or उत्सर्जन) कामगिरी आणखी बळकट बनली आहे. ह्या प्रोजेक्टने गुजरातमधील 'AM/NS इंडियाच्या' महत्वाच्या हाझिरा प्लँटला 2025 मध्ये क्लीन पॉवर पुरवायला सुरुवात केली आहे. डिसेंबर 2025 मध्ये, आर्सेलॉरमित्तलने महाराष्ट्र,राजस्थान आणि गुजरातमधील तीन आणखी रीन्यूएबल एनर्जी प्रोजेक्ट्स मध्ये सुमारे USD 0.9 बिलियन गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे, ज्या फॅसिलिटीज्मधील पॉवर 'AM/NS इंडिया'ला पुरवली जाईल. हे पूर्ण झाल्यानंतर, हे प्रोजेक्ट्स आर्सेलॉरमित्तलची भारतातील रीन्यूएबल एनर्जी क्षमता 2 GW एवढी दुप्पट करतील.

समांतरपणे, 'AM/NS इंडिया भचाऊ,गुजरात, मध्ये 300 MW सोलर पॉवर आणि 250 MW विंड पॉवर असलेला स्वत:चा हायब्रिड एनर्जी प्रोजेक्ट विकसित करीत आहे, ज्यामुळे अंदाजे वार्षिक 90 लाख (or .9 दशलक्ष) टन्सची बचत होईल.

सर्टिफिकेशन (or प्रमाणीकरण) सुरक्षित करून, AM/NS इंडियाने फोर-स्टार रेटेड HR प्रॉडक्ट्स आणि थ्री-स्टार रेटेड CR प्रॉडक्ट्सच्या कमर्शियल प्रॉडक्शनला सुरुवात केली आहे, जे स्थानिक कस्टमर्सना विश्वसनीय, सरकारद्वारा पडताळलेला ग्रीन स्टील पर्याय उपलब्ध करून देते आणि एक स्पर्धाक्षम आणि शाश्वत स्टील प्रोड्यूसर (or उत्पादक) म्हणून जागतिक पातळीवर भारताचे स्थान बळकट (or मजबूत) बनवते. FY25 मध्ये, AM/NS इंडियाने राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेमध्ये 14% कमी $CO_2$ एमिशन्स इंटेन्सिटी (or उत्सर्जन तीव्रता) संपादित केली आहे. 2021 ह्या बेसलाइनच्या समक्ष गणना करून 2030 पर्यंत एमिशन्स इंटेन्सिटी (or उत्सर्जन तीव्रता) 20% कमी करायचे कंपनीचे लक्ष्य आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### उरुळी देवाची येथे एसबीएस रेनबो किड्स शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

उरुळी देवाची (दैनिक संध्या) : 'भारती ज्ञानपीठ' अंतर्गत उरुळी देवाची येथील एसबीएस रेनबो किड्स शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास नव-निर्वाचित नगराध्यक्ष संतोष सरोदे प्रमुख उपस्थित होते. तसेच शाळेचे संस्थापक डॉ. शांताराम सातव, नवनिर्वाचित नगरसेवक विकास भाडळे, शारदामाई भाडळे आणि राजेंद्र भाडळे उपस्थित होते. यंदाच्या स्नेहसंमेलनाची संकल्पना "मैत्री सदा सहायते" अशी होती. विद्यार्थ्यांनी विविध आकर्षक पोशाख परिधान करून फुलपाखरांप्रमाणे रंगतदार सादरीकरण करत पालकांची मने जिंकली. नृत्यनाट्य, कलात्मक सादरीकरणे आणि बालकांच्या निरागस बोबड्या बोलांमुळे उपस्थित पालकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. यावेळी नगराध्यक्ष संतोष सरोदे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "विद्यार्थी घडवायचा असेल तर विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून पालक, शिक्षक आणि विद्यार्थी या त्रिसूत्रीने काम करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना प्रेम व माया देऊन अभ्यासाकडे प्रवृत्त करा आणि येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्यांना सज्ज करा," असे मार्गदर्शन त्यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापिका भारती सातव यांनी शाळेची पार्श्वभूमी व प्रगतीची माहिती दिली. उपमुख्याध्यापिका सौ. शितल चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम आनंददायी वातावरणात आणि उत्साहात पार पडला.

### सोन्यात मोठी घसरण, चांदी झाले 32 हजारांनी स्वस्त



नागपूर (दैनिक संध्या) : जागतिक बाजारपेठेतील घडामोडींचा मोठा परिणाम गुरुवारी सराफा बाजारावर दिसून आला. बुधवारी ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचलेले सोने आणि चांदीचे भाव गुरुवारी अनपेक्षितपणे कोसळले. एकाच दिवसात सोन्याच्या दरात ७ हजार रुपयांची, तर चांदीत तब्बल ३२ हजार रुपयांची मोठी घसरण झाल्याने ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. गुरुवारी २४ कॅरेट सोन्याचे भाव ३ टक्के जीएसटीसह १,५८,१०० रुपये आणि प्रति किलो चांदी २,६३,१६० रुपयांपर्यंत कमी झाली. नागपूर हे सोन्याच्या व्यापाराचे मोठे केंद्र असल्याने, अचानक झालेल्या या घसरणीमुळे सराफा बाजारात मोठी चर्चा सुरू झाली आहे. लग्नसराईचा हंगाम जवळ येत असल्याने दर कमी झाल्याचा फायदा ग्राहकांना घेता येईल. मात्र, बाजारातील ही अस्थिरता पाहता गुंतवणूकदार आता 'वाट पाहा आणि मगच खरेदी करा' अशी भूमिका घेताना दिसत आहेत.

## ५० वर्षे, एक राष्ट्र, असंख्य मॅगी 'एकत्रितपणाचे क्षण'

नवी दिल्ली (दै. संध्या) :

- आता अधिकृतपणे प्रमाणित
- भारतामध्ये मॅगीचे 50 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त जारी केलेले स्मारक टपाल तिकीट

नेस्ले इंडिया भारतातील मॅगीच्या ५० वर्षांचा उत्सव साजरा करताना एक स्मरणीय पोस्टल स्टँप लॉन्च करताना आनंदित आहे. हा स्टँप श्री मनीष तिवारी, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, नेस्ले इंडिया, आणि श्री चिराग पासवान, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री, भारत सरकार यांच्या हस्ते अनावरण करण्यात आला. हा स्टँप मॅगीच्या उत्क्रांतीला, नेहमीच नवकल्पनांसोबत पुढे राहण्याला आणि एका खूपच आवडत्या श्रेणीशी जोडलेल्या अनुभवांना सन्मान देतो – तसेच पिढ्यांमधून लोकांना एकत्र आणत राहतो, एकमेकांसोबत एकत्रित क्षण साजरे करत राहतो.

गेल्या पाच दशकांमध्ये, मॅगी भारतीय घरांमध्ये अनेक स्वादिष्ट रूपांमध्ये पोहोचले आहे – नूडल्स आणि मसालेपासून सॉस, सूप आणि रेडी-टू-कुक आवडत्या पदार्थांपर्यंत. जलद एकट्या जेवणापासून ते संपूर्ण कुटुंब एकत्र आणणाऱ्या जेवणांपर्यंत, आणि हॉस्टेलच्या स्वयंपाकघरांपासून ते मोठ्या जमावांपर्यंत, मॅगी देशभरातील असंख्य खाद्य क्षणांचा भाग राहिले आहे. "५० वर्षांचे एकत्रितपण" स्टँप या सामायिक अनुभवांना सन्मान देतो, आणि मॅगी भारतभरातील टेबल्सवर आणत असलेल्या उब, आराम आणि संबंधांचे चित्रण करतो. श्री चिराग पासवान, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री, भारत सरकार यांनी सांगितले, "भारताचा प्रक्रिया केलेल्या अन्न क्षेत्राने दशकांनंतर घरगुती विश्वास मिळवण्यात मोठी प्रगती केली आहे. पायनियर ब्रँड्सने नवीन श्रेण्या निर्माण केल्या आणि आमच्या अन्न परिसंस्थेला बळकटी दिली आहे. या अद्भुत प्रवासाचा भाग म्हणून मॅगीला ५० वर्षे पूर्ण केल्याबद्दल मी अभिनंदन करतो."

## कोटक फ्लेक्सिकॅप फंडची दीर्घकालीन संपत्ती निर्मितीच्या प्रवासाची १५ वर्षे पूर्ण

स्थापनेपासून सरासरी १६.५९ टक्के दराने वार्षिक चक्रवाढ परतावा प्रदान, शेअरबाजारातील विविध चढ-उतारांदरम्यान अतिशय मजबूत आणि सातत्यपूर्ण कामगिरीचे प्रदर्शन

मुंबई (दै. संध्या) :

कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड ("केएमएएमसी" / "कोटक म्युच्युअल फंड") च्या 'कोटक फ्लेक्सिकॅप फंड' योजनेने आपल्या वाटचालीच्या १५ वर्षांचा टप्पा अतिशय यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. या फंड योजनेने तिच्या शुभारंभापासून आतापर्यंत गुंतवणूकदारांना सरासरी १६.५९ टक्के दराने वार्षिक चक्रवाढ परतावा प्रदान केला आहे. बाजारातील विविध चढ-उतारांच्या काळातही या फंडाने या दीर्घकाळात अतिशय दमदार कामगिरीची नोंद केली आहे.

कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश शाह म्हणाले, "कोटक फ्लेक्सिकॅप फंडने १५ वर्षे पूर्ण करणे हा आमच्यासाठी त्याचबरोबर या फंडाशी एकनिष्ठ राहिलेल्या गुंतवणूकदारांसाठी अतिशय अभिमानाचा क्षण आहे. फ्लेक्सिकॅप हा गुंतवणूक प्रकार अतिशय महत्त्वाचा ठरला आहे, कारण तो गुंतवणूकदारांना भारताच्या विविध क्षेत्रातील आर्थिक प्रगतीत सहभागी होण्यास संधी देतो. त्याचबरोबर विविध भांडवली मूल्याच्या कंपन्यांमध्ये किती पैसे गुंतवायचे, याचा निर्णय घेण्याची जबाबदारी एका अनुभवी गुंतवणूक टीमवर सोपवण्याची सुविधाही पदान करत."

३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, 'कोटक फ्लेक्सिकॅप फंडच्या 'डायरेक्ट प्लॅन - ग्रोथ ऑप्शन' ने गेल्या १० वर्षांत सरासरी १५.७० टक्के दराने वार्षिक चक्रवाढ आणि गेल्या ५ वर्षांत सरासरी १६.८७ टक्के दराने वार्षिक चक्रवाढ परतावा दिलेला आहे. या फंडाचे व्यवस्थापन कोटक महिंद्रा एएमसीच्या सीआयओ हर्षा उपाध्याय करत आहेत आणि त्यांची गुंतवणूकीची विचारसरणी कंपनीचे शाश्वत उत्पन्न, सक्षम प्रशासन आणि भांडवली कार्यक्षमता या तत्वांवर आधारलेली आहे.

या फंडाच्या कामगिरीबद्दल बोलताना हर्षा उपाध्याय म्हणाल्या, "आम्ही सातत्याने शाश्वत कमाईची क्षमता आणि उत्कृष्ट भांडवल कार्यक्षमता असलेल्या कंपन्यांना प्राधान्य दिल्यामुळे कोटक फ्लेक्सिकॅप फंडाने गेल्या १५ वर्षांत शेअरबाजारातील विविध चढ-उतारांदरम्यान अतिशय यशस्वीरित्या मार्गक्रमण केले आहे. आमचा भर नेहमीच बाजारात अल्पकालीन कालावधीतील प्रवाहाच्या मागे न धावता, सखोल संशोधनावर आधारित समभागांच्या निवडीवर राहिलेला आहे. या दृष्टिकोनामुळे गुंतवणूकदारांना भारताच्या विकासामध्ये खऱ्या अर्थाने सहभागी होता आला आणि त्यांना दीर्घकाळात सातत्यपूर्ण परतावा देण्याचे आमचे उद्दिष्ट सफल झाले आहे."

फ्लेक्सिकॅप फंड हा लार्ज-कॅप, मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप अशा सर्व प्रकारच्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करत असल्यामुळे बदलत्या बाजार परिस्थितीनुसार तो लवचिक राहू शकतो. डिसेंबर २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, कोटक फ्लेक्सिकॅप फंडाने सुमारे ७३ टक्के गुंतवणूक मोठ्या कंपन्यांमध्ये, १९ टक्के मध्यम कंपन्यांमध्ये आणि ५ टक्के लहान कंपन्यांमध्ये केली आहे. या फंडाचा पोर्टफोलिओ साकारताना 'टॉप-डाउन' पध्दतीने क्षेत्राचा अभ्यास आणि 'बॉटम-अप' पध्दतीने विशिष्ट समभागाची निवड अशा दोन्ही पद्धतींचा वापर केला जातो. या फंडाची मुख्य गुंतवणूक वित्तीय सेवा, ऑटोमोबाईल आणि त्याचे सुटे भाग, कॅपिटल गुड्स, रसायने, बांधकाम साहित्य आणि ग्राहक सेवा या क्षेत्रांतील कंपन्यामध्ये आहे. जिथे समभागाची किंमत रास्त आहे आणि भविष्यातील नफ्याची स्पष्टता दिसत आहे, अशा दीर्घकालीन संधी शोधण्यासाठी संशोधनावर आधारलेला दृष्टिकोन या फंडाला गुंतवणूकीसाठी मदत करतो.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकीकरिता प्रशासन सज्ज : नावडकर

बारामती (दै. संध्या) :

बारामती तालुक्यातील एकूण ६ जिल्हा परिषद गट व १२ पंचायत समिती गणाकरिता ७ फेब्रुवारी रोजी मतदान तर जिल्हा क्रीडा संकुल बारामती येथे ९ फेब्रवारी रोजी मतमोजणी होणार असून याकरिता प्रशासन सज्ज आहे, अशी माहिती जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ चे निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी केले आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम २०२६ अंतर्गत तालुक्यातील एकूण ६ जिल्हा परिषद गट व त्या अंतर्गत १२ पंचायत समिती गणांकरिता जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक कार्यक्रमाची १६ जानेवारी २०२६ रोजी सूचना प्रसिद्ध केली. उमेदवारांडून नामनिर्देशनपत्र १६ ते २१ जानेवारी या कालावधीमध्ये स्विकारण्यात आलेल्या नामनिर्देशनपत्राची छाननी करुन २२ जानेवारी रोजी निर्णय देण्यात आले. २७ जानेवारी रोजी उमेदवारी माघारी घेण्यात आली. जिल्हा परिषद गटामध्ये सुपा ३, गुणवडी ३, पणदरे ९, वडगाव निंबाळकर ५, निंबुत ६ आणि निरावागज ५ असे एकूण ३१ उमेदवार तसेच सुपा २, का-हाटी २ , शिर्सुफळ ३, गुणवडी ४, पणदरे ६, मुढाळे ३, मोरगाव ३, वडगाव निंबाळकर ७, निंबुत ७, कांबळेश्वर २, निरावागज २, डोर्लेवाडी २ असे एकूण ४३ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. निवडणूक कामकाजाच्याअनुषंगाने २५ तालुकास्तरीय समन्वय अधिकारी, ४० क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एकूण ६ भरारी पथकामध्ये १८ आणि ८ स्थिर निरीक्षण पथकामध्ये २४ तसेच १२ व्हिडीओ निरीक्षण पथकामध्ये ३६ तसेच २ व्हिडीओ व्हिंविंग पथकामध्ये ४ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेकरिता एकूण १ हजार ९४५ अधिकारी, कर्मचारी तथा शिक्षकगण नियुक्त करण्यात आलेले आहेत. निवडणूक घोषित झालेल्या क्षेत्राची लोकसंख्या ३ लाख १६४ असून त्यातील जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूकीकरिता मतदार संख्या पुरुष १ लाख ३५ हजार ७३, महिला १ लाख २९ हजार ५६०, इतर ९ असे एकूण २ लाख ६४ हजार ६४२ इतकी आहे.

बारामती तालुक्यात २९९ केंद्र आहेत. याअंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळी येथे महिला मतदान केंद्र तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कटफळ येथे आदर्श मतदान केंद्र असणार आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोर्लेवाडी, गंगुबाई काटे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी, नवमहाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पणदरे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी येथे ५ किंवा ५ पेक्षा जास्त मतदान केंद्र असणार आहेत. निवडणुकीकरिता कंट्रोल युनिट (सीयू) २९९, बॅलेट युनिट (बीयू) ३४५ याव्यतिरिक्त सीयू ६० आणि बीयू १२० राखीव ठेवण्यात येणार आहे. टपाली मतदानाकरिता ७४३ अर्ज प्राप्त झाले असून आज अखेर ३१३ मतदारांनी टपाली मतपत्रिकेद्वारे मतदान केले आहे. प्रत्येक केंद्रावर स्वच्छतागृह, पाळणा, व्हीलचेअर, रॅम्प, वैद्यकीय सुविधा, पोलीस संरक्षण, अग्निशामक, वाहनतळ आदी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता मतदान जनजागृती कार्यक्रम आयोजित तसेच प्रसारमाध्यमातून मतदान करण्याबाबत प्रसिध्दी देण्यात आली आहे. विजयी उमेदवारांची नावे १० फेब्रुवारी २०२६ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. येत्या येणाऱ्या ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीकरिता पात्र मतदारांनी मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी केले आहे.

## मतदान केंद्रावर मोबाईल वापरण्यास प्रतिबंध

बारामती (दै. संध्या) :

- निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर
- निवडणुका पारदर्शक वातावरणात आणि शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन

जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाकरिता तालुक्यात ७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर मोबाईल वापरण्यास प्रतिबंध घालण्यात येत आहे; निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांतता, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ चे निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी केले आहे.

पक्ष आणि उमेदवारांनी मतदान केंद्रापासून २०० मीटर लांब तात्पुरत्या कार्यस्थानी (उमेदवार, पक्षामार्फत चिठ्ठी वाटपाकरिता लावण्यात येणारे टेबल) विनाकारण गर्दी होणार नाही तसेच त्याठिकाणी कोणतेही भित्तीपत्रक, ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य लावू नये तसेच कोणत्याही खाद्यपदार्थाचे वाटप केले जाणार नाहीं किंवा गर्दी होईल अशी कोणतीही कृती केली जाणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रामध्ये निवडणूक चिन्हे, पक्ष, उमेदवाराचे नाव असलेले कोणतेही प्रचार साहित्य यामध्ये चिन्ह छपाई केलेले टी शर्ट, टोप्या, उपरणे तसेच छापील चिठ्ठया आदी आणता येणार नाही.

उमेदवार, उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी यांना मतदानाचे निरिक्षणासाठी मतदान केंद्राचे आत ३ मतदाराचे मतदान होईपर्यतच थांबता येईल, त्यानंतर उमेदवाराने मतदान केंद्राच्या बाहेर पडावे. उमेदवार, उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधीस एका मतदान केंद्रामध्ये संपूर्ण मतदानाच्या कालावधीत जास्तीत जास्त तीन वेळा जाता येईल.

मतदानाच्या दिवशी वाहनाच्या वापराबाबत राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशाचे पालन करुन सर्व पक्षांचे उमेदवार व कार्यकत्यांनी सहकार्य करावे. वाहन परवाना वाहनांच्या दर्शनी भागांवर ठळकपणे लावावे. मतदानाच्या दिवशी प्रत्येक उमेदवारास स्वतःच्या किंवा निवडणूक प्रतिनिधीच्या वापरासाठी दोन वाहने वापरण्याचा अधिकार असेल. ही वाहने त्याच्या मतदारसंघातच वापरता येतील. कोणत्याही उमेदवारास अथवा पक्षाला मतदारांची ने-आण करण्यासाठी कुठल्याही वाहनाचा वापर करता येणार नाही.


**MAHAVITARAN** — Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

The Superintending Engineer, MSEDCL, Rasta Peth Urban Circle, Administrative Building, Rasta Peth, Pune-411011 invites Tenders from e-Registered firms with MSEDCL for Empanelment of Agencies for Breakdown Maintenance of Substation in Rasta Peth Urban Circle, Pune Zone as details below:

| Tender No. | Socpe of Work | Tender Fees & EMD |
|---|---|---|
| SE/RPUC/T-09/ 2025-26 | Tender for Empanelment of Agencies for Breakdown Maintenance of Substation in Rasta Peth Urban Circle, Pune Zone | Tender fee Rs. 1,000/- + 18% GST, EMD - Rs. 10,000/- |

Bid documents are available on our website https://etender.mahadiscom.in/eatApp/ from 6.02.2026 to 19.02.2026, Contact No. 7875767015. Any changes will be notified on E-tender site only.

PRO/PZ - 221/2025-26 — Superintending Engineer MSEDCL, Rasta Peth Urban Circle



**पुणे महानगरपालिका, पुणे**

निविदा प्रक्रिया कक्ष पाणीपुरवठा विभाग

निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : ०६/०२/२०२६ ०२:३० दुपारी ते १६/०२/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत

स्वीकृती दिनांक : ०६/०२/२०२६ ०२:३० दुपारी ते १६/०२/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : १७/०२/२०२६ ०३:०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_ SUPPLY/ 2025/629 | पाणी पुरवठा | प्रभाग क्र. २३ नटराज कॉलनी पाण्याची लाईन दुरूस्ती करणे व नव्याने टाकणे. | रु. १३५९/- | रु. २५३९४६१/- | रु. २५३९५/- | ५ | तेजस्विनी अरूण बागुल ७७५७९७१८७० |
| PMC/WATER_ SUPPLY/ 2025/630 | पाणी पुरवठा | प्रभाग क्र. २३ साईनाथ वसाहत पाण्याची लाईन दुरूस्ती करणे व नव्याने टाकणे. | रु. १३५९/- | रू. २६७४३५२/- | रू. २६७४४/- | ५ | तेजस्विनी अरूण बागुल ७७५७९७१८७० |
| PMC/WATER_ SUPPLY/ 2025/631 | पाणी पुरवठा | प्रभाग क्र. २३ काळेपडळ पाण्याची लाईन दुरूस्ती करणे व नव्याने टाकणे. | रु. १३५९/- | रू. ३३८६१०२/- | रू. ३३८६१/- | ६ | तेजस्विनी अरूण बागुल ७७५७९७१८७० |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.

क) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.

ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS /RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/- Atharva Nitin Khutwad, टेंडर लिपिक, पाणीपुरवठा, पुणे महानगरपालिका

सही/- Rajesh Shinde, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, पुणे महानगरपालिका

जाहिरात क्रमांक : २/१६४२ दि. ०५/०२/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे...



## दुचाकीवर येऊन महिलांच्या गळ्यातील दागिने चोरणारे दोन सराईत गजाआड

■ पिंपरी चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट-१ ची कामगिरी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा युनिट–१ पथकाने महिला चेन स्नॅचिंगच्या गंभीर गुन्ह्यांचा पर्दाफाश करत दोन सराईत गुन्हेगारांना अटक केली आहे. या कारवाईत सुमारे १०० ग्रॅम सोन्याचे दागिने, अंदाजे ३ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींनी दुचाकीवरून महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी जबरदस्तीने हिसकावून पसार होण्याचे प्रकार पिंपरी-चिंचवड, पुणे शहर तसेच नाशिक ग्रामीण भागात केल्याचे तपासात उघड झाले आहे. ५०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करून आरोपींचा माग काढण्यात आला. पोलीस तपासादरम्यान आरोपी नाशिक परिसरात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने तात्काळ कारवाई करत त्यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी संत तुकाराम नगर व चिखली पोलीस स्टेशन हद्दीत चेन स्नॅचिंग केल्याची कबुली दिली. या आरोपींविरोधात नाशिक ग्रामीण पोलीस ठाण्यांमध्ये यापूर्वीही २५ पेक्षा अधिक सोनसाखळी चोरी विरोधातील गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. पिंपरी-चिंचवड आयुक्तालयातील संत तुकाराम नगर व चिखली पोलीस ठाण्यांत दाखल असलेले गुन्हे उघडकीस आले आहेत. ही कारवाई पोलीस उप आयुक्त (गुन्हे) डॉ. शिवाजी पवार, सहा. पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट–१ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेंद्र ठाकरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुळीग, पोलीस उपनिरीक्षक कर्मराज गावडे, पोलीस उप निरिक्षक प्रमोद वेताळ, संतोष इंगळे, पोलीस हवालदार महादेव जावळे, जयवंत राऊत, देवा राऊत, शिवराम भोपे, अजय डगळे, शेळकंदे, पोलीस शिपाई संदेश देशमुख, लक्ष्मीकांत पतंगे, विजय जानराव, तेजस भालचिम, चिखलकर खेडकर यांनी केली आहे.

## कल्चर क्रेस्ट सहकारी गृहनिर्माण संस्थेची कार्यकारणी बरखास्त - प्रशासकाची नियुक्ती

पिंपरी (दैनिक संध्या) : मोशी- स्पाईन सिटी रोड लगत असलेल्या कल्चर क्रेस्ट सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष डॉ सुहास जोशी, सचिव राजेश घुंगार्डे तर खजिनदार कुणाल तोडकर आणि इतर पदाधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे रहिवाशी अनिल सौंदाडे आणि विजय तोडकर यांनी सहकारी संस्था उपनिबंधक दापोडी यांच्याकडे केलेल्या तक्रारीवरून विद्यमान कार्यकारणी बरखास्त करीत असल्याचे उपनिबंधक मुकुंद पवार यांनी निर्देश देऊन संस्थेवर प्रशासक म्हणून बाळकृष्ण घुगे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ५८ अन्वये संस्थेच्या समितीमधील एकूण पाच सदस्य महेंद्रकर प्रशांत, जयेश ढमाले, दिगंबर वाडेकर ,अजिंक्य मारूडवार आणि डॉ. शैलजा माने यांना अगोदरच संस्थेच्या नियमित सभांना हजर न राहणे, निर्णय प्रक्रियेत सहभाग न नोंदविणे व दैनंदिन कामकाजात लक्ष न देणे , यामुळे पदावरून अगोदरच पदूच्यत करून सदस्यत्व रद्द केले होते. त्या नंतर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनातील त्रुटी आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या मनमानी कारभार याला कंटाळून डॉ. दत्तात्रय खुणे आणि धनंजय गावडे यांनी समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा सप्टेंबर २०२५ रोजी दिला होता. अर्जदार यांच्या अर्जास अनुसरून प्रथम दर्शनी संस्थेच्या उपविधीनुसार आवश्यक ती गणसंख्या ७ पूर्ण होत नसल्याने संस्था कायदा, नियम व उपविधी यांच्यातील तरतुदीनुसार कोणताही निर्णय घेऊ शकत नसल्याने, संस्थेच्या व्यवस्थापन समितीमध्ये पोकळी निर्माण झाल्यामुळे मा. उपनिबंधक यांच्या निदर्शनास आणून दिल्या मुळे कलम ७७ अ (फ )(दोन) तरतुदी नुसार त्वरित कारवाई करून प्रशासकाची नेमणूक केली आहे.



## दिवंगत अजितदादा पवार यांना अभिवादन

पिंपळे सौदागर (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्याचे लाडके दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली असून त्यांच्या स्मरणार्थ पिंपळे सौदागर येथे भावपूर्ण शोकसभेचे आयोजन करण्यात आले. शिवशंभो सेवा मंडळ, समस्त ग्रामस्थ पिंपळे सौदागर व श्री. विठ्ठल उर्फ नाना काटे मित्र परिवार यांच्या वतीने गुरुवार, दिनांक ०५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता महादेव मंदिर, पिंपळे सौदागर येथे ही शोकसभा आयोजित करण्यात आली होती. स्व. अजितदादा पवार यांनी आपले नेतृत्व, धैर्य आणि जनसेवेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी पिंपळे सौदागर येथील सर्व ग्रामस्थ, शिवशंभो सेवा मंडळाचे पदाधिकारी, तरुण वर्ग तसेच महिला व माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शोकसभेस उपस्थित सर्वांनी स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## निगडी येथे मेट्रो प्रकल्पाच्या रात्रीच्या कामामुळे नागरिक त्रस्त

पिंपरी (दैनिक संध्या) : निगडी ते पिंपरी मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम सध्या मुंबई–पुणे महामार्गावरील निगडी बस स्टॉप परिसरात सुरू असून, या ठिकाणी पोकलँड मशीनच्या सहाय्याने रस्त्यावर खड्डे खोदण्याचे काम रात्रीच्या वेळेत सुरू आहे. या कामामुळे मोठ्या प्रमाणात आवाज होत असून आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना तीव्र त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळेत सुरू असलेल्या या कामामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले तसेच विद्यार्थी वर्ग त्रस्त झाला आहे. सध्या दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा जवळ आल्या असून, या गोंगाटाचा त्यांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. या प्रकरणी नागरिकांच्या वतीने 112 क्रमांकावर तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलीस कंट्रोल रूम व पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त यांच्याकडेही लेखी तक्रार देण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ता सचिन काळभोर यांनी पुणे मेट्रो प्रकल्पाचे अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी या विषयाकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी केली आहे. निगडी बस स्टॉप परिसरात सुरू असलेले रस्ते खोदण्याचे मेट्रो प्रकल्पाचे काम रात्री 10 ते पहाटे 6 वाजेपर्यंत बंद ठेवावे, जेणेकरून नागरिकांना विनाकारण त्रास सहन करावा लागणार नाही, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

# छ. शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व नियोजन बैठक संपन्न

पिंपरी (दै. संध्या) :



छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६ च्या अनुषंगाने प्राप्त सूचनांवर संबंधित विभागांमार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल तसेच छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व अधिक नियोजनबद्ध, प्रभावी व नागरिकांच्या व्यापक सहभागातून राबविण्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासन सकारात्मक असून, आवश्यक त्या सर्व सुविधा व समन्वय उपलब्ध करून दिला जाईल, असे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे म्हणाले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्वाच्या अनुषंगाने शहरातील विविध शिवजयंती उत्सव समिती तसेच सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी समवेत महापालिका अधिकारी यांची संयुक्त बैठक आज पालिकेमधील दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृह येथे आयोजित करण्यात आली होती,या बैठकीत अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे बोलत होते.

या बैठकीस सह शहर अभियंता मनोज सेटिया, उप आयुक्त अण्णा बोदडे, ममता शिंदे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, कार्यकारी अभियंता सतीश वाघमारे,वैशाली ननावरे, शिवाजी चौरे,गणेश राऊत, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,उप अभियंता दमयंती पवार, कार्यालय अधिक्षक राजू कांबळे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव, जीवन बोराडे, सागर तापकीर, प्रकाश जाधव, ॲड. लक्ष्मण रानवडे, सतीश काळे, समीर जावळकर, वसंतराव पाटील, बाळा दानवले, कुणाल कांबळे, सतीश डांगे, प्रल्हाद कांबळे, अश्विनी पाटील, माणिक शिंदे, स्मिता म्हसकर, दिलीपराव गावडे, नवनाथ म्हस्के, मारुती लोखंडे,सुरेंद्र पासलकर, तात्याबा माने, कौशल्या जाधव, प्रविण पायाळ, संतोष म्हस्के,गणेश मासाळ,विशाल बोंगाळे, अपर्णा देशमुख, योगेश बाथम,मयुर गायकवाड, अजय पाताडे, नरेंद्र बनसोडे,आबासाहेब ढवळे,ॲड.अनिल पवार,सचिन बोऱ्हाडे तसेच विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीदरम्यान उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व अधिक व्यापकपणे राबविण्याच्या दृष्टीने विविध सूचना मांडल्या. महापालिका शाळांमध्ये दरवर्षी प्रमाणे यावर्षीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन व कार्यावर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे, तसेच त्यांच्या जीवनचरित्रावर आधारित भव्य महानाट्याचे आयोजन करावे,अशी मागणी करण्यात आली.

प्रबोधन पर्वाचे नियोजनात अधिक सुसूत्रता होण्यासाठी दरवर्षी फेब्रुवारी ऐवजी जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नियोजन बैठक घेण्यात यावी,अशी सूचना उपस्थितांनी मांडली. शालेय विद्यार्थ्यांसोबतच खुल्या प्रवर्गासाठी पोवाडे, निबंध, वक्तृत्व स्पर्धा यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे, तसेच पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथेही कार्यक्रमांचे आयोजन करावे, अशा सूचना बैठकीत केल्या.

भक्ती-शक्ती येथील समूहशिल्पास पुष्पहार अर्पण करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, समूहशिल्पाची डागडुजी करून परिसराची स्वच्छता करावी, तसेच शिल्पाच्या मागील बाजूस इमारती, हॉटेल्स अथवा फलक दिसू नयेत यासाठी योग्य नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली. भक्ती-शक्ती चौक येथील उड्डाणपुलास कार्यक्रमाच्या एक आठवडाभर आधी विद्युत रोषणाई करावी आणि एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास नागरिकांना दाखवावा,असेही सुचविण्यात आले.

महापालिकेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात यावा. कार्यक्रमाच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी नियोजन करावे, दरवर्षीप्रमाणे शिवजयंती पूर्वी शहरातील सर्व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिल्पांची स्वच्छता करण्याबाबतही सूचना यावेळी करण्यात आल्या. बैठकीचे प्रास्ताविक उप आयुक्त अण्णा बोदडे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

महानाट्य व इतर कार्यक्रमांच्या ठिकाणी स्वच्छतागृह,पार्किंग व सुरक्षेची पुरेशी व्यवस्था करण्यात यावी, गतवर्षी प्रमाणे रक्तदान शिबिरांच्या ठिकाणी पंखे, पिण्याचे पाणी व कुलरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच विविध शहरांतून ज्योत घेऊन येणाऱ्या शिवप्रेमींचा यथोचित सन्मान करण्यात यावा, अशी मागणी बैठकीत करण्यात आली.



## देशाची प्रतिमा उंचावण्यासाठी युवकांची मोठी भूमिका : डॉ. विनोद गायकवाड

■ पीसीसीओईआर येथे पासपोर्ट सेवा शिबिर संपन्न

पिंपरी (दै. संध्या) :

भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे. यामध्ये शेती, उद्योग, शिक्षण, संशोधन आणि उच्च शिक्षित कुशल मनुष्यबळ या विभागांचे मोठे योगदान आहे. भारतीय युवा वर्ग उच्च शिक्षण, संशोधन आणि रोजगारासाठी परदेशात जाण्यासाठी प्रयत्न करत असतो. हे प्रमाण यापुढेही उत्तरोत्तर वाढतच जाणार आहे. देशाची अर्थव्यवस्था पुढे आणि जागतिक प्रतिमा उंचावण्यासाठी युवकांची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे असे प्रतिपादन भारतीय परराष्ट्र सेवा विभाग अधिकारी डॉ. विनोद गायकवाड यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) येथे पासपोर्ट सेवा शिबिर व भारतीय परराष्ट्र सेवा अधिकाऱ्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी डॉ. गायकवाड यांनी उपस्थित यांना मार्गदर्शन केले. डॉ. गायकवाड यांचे पीसीसीओईआरचे संचालक डॉ हरीश तिवारी यांनी स्वागत केले. उपसंचालक डॉ. राहुल मापारी, शिक्षक, विद्यार्थी, नागरिक व इतर कर्मचारी आदी उपस्थित होते. परराष्ट्र सेवेत असलेल्या करिअरच्या संधी, स्पर्धा परीक्षांची तयारी, परदेशात जाताना घ्यावयाची काळजी, बाहेरच्या देशात वावरताना तेथील नियम जाणून घेणे, भारतीय दूतावास बद्दल माहिती तेथील हेल्पलाइन नंबर, तेथे काही समस्या आल्यास त्यावरील उपाय, भारतीय परराष्ट्र सेवे संबंधी असलेले अनेक गैरसमज दूर करत देशसेवेचे महत्त्व डॉ. गायकवाड यांनी सांगितले. तसेच शिबिरामध्ये पासपोर्ट साठीची अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, अर्ज सादर करण्याचे प्रात्यक्षिक सादर केले. डॉ. शिवाजी चव्हाण, डॉ. अर्चना कोल्लू, पासपोर्ट ड्राईव्ह टीम व स्वयंसेवक यांनी आयोजनात सहभाग घेतला.

## महापालिकेच्या थेरगाव, जिजामाता आणि नेहरूनगर या तीन आरोग्य सुविधा केंद्रांना भारत सरकारतर्फे राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र

**हे मानांकन मिळवणारी पिंपरी चिंचवड ही महाराष्ट्रातील पहिली महापालिका!**



पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थेरगाव, जिजामाता आणि नेहरूनगर या तीन शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकांनुसार (एनक्यूएएस) राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाले आहे. हे मानांकन मिळवणारी पिंपरी चिंचवड महापालिका ही महाराष्ट्रातील पहिली महापालिका ठरली आहे. या प्रमाणपत्रामुळे वैद्यकीय विभागाच्या गुणवत्तापूर्ण सेवांची राष्ट्रीय स्तरावर नोंद झाली असून, नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांच्या विश्वासार्हतेलाही अधिक बळ मिळाले आहे. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन (एनक्यूएएस) हे संक्रमण नियंत्रण, क्लिनिकल केअर, रुग्ण हक्क, रुग्णालय व्यवस्थापन व सेवा सुधारणा अशा महत्त्वपूर्ण निकषांवर आधारित असते. या सर्व निकषांची पूर्तता करत संबंधित केंद्रांनी आरोग्य सेवांच्या गुणवत्तेत आपला उच्च दर्जा सिद्ध केला आहे.

महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली या आरोग्य सुविधा केंद्रांना हे यश मिळवून देण्यासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोरी नलवडे व शहर गुणवत्ता आश्वासन समन्वयक (सीक्यूएसी) डॉ. कोमल बनसोडे आणि संपूर्ण टीम यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न केले. तसेच डॉ. छाया शिंदे आणि डॉ. शैलजा भावसार यांचेही विशेष सहकार्य लाभले.

भारत सरकारतर्फे मिळालेले राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र (एनक्यूएएस) हे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य सेवेत सातत्याने होत असलेल्या सुधारणा आणि गुणवत्तेच्या बांधिलकीचे द्योतक आहे. महापालिकेच्या आरोग्य सुविधा केंद्रांनी मिळवलेले हे यश संपूर्ण शहरासाठी अभिमानास्पद आहे.
**- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना मिळालेले राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र हे वैद्यकीय विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या संयुक्त प्रयत्नांचे फलित आहे. नागरिकांना उच्च दर्जाची, सुरक्षित आणि रुग्ण-केंद्रित सेवा देण्याचा आमचा संकल्प यामुळे अधिक दृढ झाला आहे.
**- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका**

### आरोग्य सेवांवर नागरिकांचा वाढतोय विश्वास

महापालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रांमध्ये स्वच्छता, सेवा-सुविधा आणि बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट या प्रक्रियांना जागतिक आरोग्य संघटना (डब्लूएचओ) आणि भारत सरकारच्या मानकांनुसार काटेकोरपणे अंमलात आणले जाते. नियमित निर्जंतुकीकरण, प्रतीक्षालयांची स्वच्छता, ओपीडी व्यवस्थापन आणि सुरक्षित उपचार वातावरणामुळे महापालिकेच्या आरोग्य सुविधांवर नागरिकांचा विश्वास वाढत आहे.

## निगडी- दापोडी रस्त्यावर हलक्या वाहनांसाठी भुयारी मार्गाला मिळणार गती

**नगरसेवक संदीप वाघेरे यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा; आयुक्तांना दिले निवेदन**

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी- चिंचवड शहरातील वाहतूक सुलभतेसाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या निगडी- दापोडी रस्त्यावरील पिंपरी डेअरी फार्म रेल्वे उड्डाणपूलासमोर हलक्या वाहनांसाठी भुयारी मार्ग (Light Vehicular Underpass) उभारणीच्या कामाला लवकरच गती मिळणार आहे. या संदर्भात नगरसेवक संदीप वाघेरे यांनी महापालिका आयुक्तांची प्रत्यक्ष भेट घेऊन तातडीने निविदा प्रक्रिया राबवून काम सुरू करण्याची ठोस मागणी केली आहे. पिंपरी LC गेट क्र. ६० येथे उभारण्यात येत असलेला चार पदरी रेल्वे उड्डाणपूल अंतिम टप्प्यात असून लवकरच त्याचे लोकार्पण होणार आहे. हा उड्डाणपूल पिंपरी गाव, रहाटणी, काळेवाडी व पिंपळे सौदागर परिसरातील नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे. मात्र उड्डाणपूलावरून येणाऱ्या वाहनांना पुणे- मुंबई महामार्ग ओलांडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत वळसा घ्यावा लागतो, त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होते. ही अडचण लक्षात घेऊन नगरसेवक संदीप वाघेरे यांनी सातत्याने महापालिकेकडे पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांतून या प्रकल्पासाठी सल्लागाराची नेमणूक करून अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय समितीकडून तत्वतः मान्यताही मिळाली आहे. सदर प्रकल्पाचा समावेश सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात करण्यात आला असून महापालिका सभेने दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. या भुयारी मार्गासाठी एकूण रु. ४० कोटींची प्रशासकीय मान्यता असून चालू आर्थिक वर्षासाठी रु. १० लाखांची तरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक वाघेरे यांनी आयुक्तांकडे निविदा प्रक्रिया तातडीने राबवून कामाचे आदेश त्वरीत देण्याची जोरदार मागणी केली आहे. हा भुयारी मार्ग लवकरात लवकर सुरू झाल्यास हलक्या वाहनांना सुरक्षित व सुलभ मार्ग उपलब्ध होणार असून नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सतिश गावडे, राकेश मोरे, सतीश लांडगे उपस्थित होते.

शहराच्या वाहतूक नियोजनात महत्त्वाचा टप्पा ठरणाऱ्या या प्रकल्पामुळे निगडी–पिंपरी परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिकेचा ७०२ कोटींचा मालमत्ता कर वसूल

पिंपरी (दै. संध्या) :



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत १ एप्रिल २०२५ पासून ते २ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ७०२ कोटी ७३ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. तसेच पुढील दोन महिन्यांत मालमत्ता कर वसुलीच्या दृष्टीने व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे. तरी ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांनी तो लवकरात लवकर भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

महापालिकेच्या कर संकलन विभागाने यावर्षी कर वसुलीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. ऑनलाईन पेमेंट प्रणाली तसेच विविध डिजिटल माध्यमांद्वारे नागरिकांना कर भरण्यासाठी सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यासोबतच, कर भरण्याबाबत एसएमएस, नोटीस व प्रत्यक्ष भेटीद्वारे नियमित पाठपुरावा करण्यात आल्याने वसुलीच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे.

कर आकारणी व कर संकलन विभागाची १ एप्रिल २०२५ पासून ते २ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत वाकड विभागीय कार्यालयांतर्गत सर्वात जास्त वसुली झाली आहे. या कालावधीत या कार्यालयाने ८७ कोटी ४४ लाख रुपयांची वसुली केली आहे. तर चिंचवड विभागीय कार्यालयाने ४५ कोटी ४९ लाख, चिखली कार्यालयाने ५४ कोटी २७ लाख, कस्पटे वस्ती कार्यालयाने ४९ कोटी ९८ लाख, मनपा भवन ३४ कोटी २१ लाख, भोसरी ४४ कोटी ९१ लाख, सांगवी ३५ कोटी २६ लाख, मोशी ४३ कोटी ५२ लाख, पिंपरी वाघेरे ४२ कोटी २ लाख, किवळे ४७ कोटी ८७ लाख, थेरगाव ६९ कोटी ३ लाख, चऱ्होली २७ कोटी २१ लाख, निगडी प्राधिकरण १५ कोटी ६५ लाख, पिंपरी नगर ५ कोटी ७८ लाख, आकुर्डी ३२ कोटी ९४ लाख, दिघी-बोपखेल २१ कोटी ४० लाख, तळवडे १७ कोटी ६३ लाख, फुगेवाडी-दापोडी विभागीय कार्यालयाने २८ कोटी १० लाख रुपयांची वसुली केली आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने केलेले नियोजनबद्ध काम, नागरिकांचा वाढता सहभाग आणि वेळेत कर भरण्यासाठी देण्यात आलेल्या सवलती यामुळे चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे. ही वसुली केवळ आर्थिक आकडा नसून, शहराच्या विकासासाठी नागरिकांनी दाखवलेल्या जबाबदारीची साक्ष आहे. उर्वरित मालमत्ताधारकांनीही वेळेत कर भरून शहराच्या विकासात आपले योगदान द्यावे.
**— तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

मालमत्ता कर संकलनासाठी विभागामार्फत ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कर भरण्याबाबत जनजागृती मोहीम, थकबाकीदारांविरोधात प्रभावी कारवाई राबविण्यात येत आहे. या सर्व उपाययोजनांमुळे चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत कर वसुलीचा आकडा ७०० कोटींच्या पुढे गेला आहे. ज्या नागरिकांनी अद्याप कर भरलेला नाही, त्यांनी पुढील कार्यवाही टाळण्यासाठी तातडीने मालमत्ता कर भरावा.
**— सचिन पवार, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

# यंग शेफ ऑलिम्पियाडच्या १२ व्या आवृत्तीत पुण्यात आंतरराष्ट्रीय शेफसचा सहभाग

पुणे (दै. संध्या)



इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (IIHM) तर्फे 'यंग शेफ ऑलिम्पियाड २०२६' (YCO) या जगातील विद्यार्थी शेफ्ससाठीच्या सर्वात मोठ्या पाककला स्पर्धेची १२वी आवृत्ती आयोजित करण्यात येत आहे. या पाककलेच्या माध्यमातून एकात्मता, ऐक्य आणि शाश्वततेचा उत्सव साजरा करणारा हा उपक्रम विविध सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या राष्ट्रांमध्ये ऐतिहासिकदृष्ट्या मैत्रीचे सेतू बांधत आला आहे. यंदा या व्यासपीठावर जगभरातील ४० हून अधिक देशांमधील विद्यार्थी शेफ्स एकत्र येत असून, तरुण व्यावसायिकांसाठीची ही जगातील सर्वात व्यापक आणि समावेशक पाककला स्पर्धा ठरत आहे.

वायसीओ (YCO ) २०२६ ची संकल्पना हि 'आर्टीफिशीअल इंटेलिजन्स (AI)' च्या माध्यमातून जागतिक पाककला वारसा जतन करणे' अशी असून, आतिथ्य शिक्षणात तंत्रज्ञानाचा जबाबदारीने समावेश करताना मानवी कौशल्य, सर्जनशीलता आणि सांस्कृतिक समज यांचे महत्त्व केंद्रस्थानी राखण्याची आयआयएचएम (IIHM) ची व्यापक दृष्टी यातून प्रतिबिंबित होते. विविध खंडांतील वेगवेगळ्या पाकपरंपरांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्पर्धकांच्या सहभागामुळे वायसीओ (YCO) २०२६' पाककलेला संस्कृतींमधील प्रभावी दुवा म्हणून अधोरेखित करते आणि तरुण पाककला प्रतिभेसाठी भारताची जागतिक भेटीचे केंद्र म्हणून भूमिका अधिक दृढ करते.

या स्पर्धेची प्राथमिक फेरी ३ फेब्रुवारी २०२६ रोजी बंगळुरू, दिल्ली, पुणे, हैदराबाद आणि गोवा या पाच शहरांमध्ये पार पडेल, तर पुण्यातील प्राथमिक फेरीत इटली, मेक्सिको, कॅनडा, मलेशिया, सायप्रस, इजिप्त आणि श्रीलंका अशा सात देशांमधील स्पर्धकांनी सहभाग घेतला. या फेरीत स्पर्धकांना 'मॉडर्न ब्रॅसेरी/ बिस्ट्रो' शैलीतील मुख्य पदार्थ म्हणून भेटकी मासा तसेच गरम किंवा थंड प्रकारातील व्हेगन डेझर्ट तयार करून चार प्लेट्समध्ये सादर करण्याचे आव्हान देण्यात आले.

तसेच मुख्य पदार्थ म्हणून क्रीमयुक्त मटर प्युरीवर पॅन-सिअर केलेला भेटकी फिश फिले सादर करण्यात आले, ज्यासोबत सेलरी, ॲस्पॅरॅगस (ही एक भाजी / वनस्पती आहे जी प्रामुख्याने युरोप, उत्तर आफ्रिका आणि पश्चिम आशियात आढळते), भाजलेले टोमॅटो व चेरी टोमॅटो देण्यात आले होते. या पदार्थावर हर्ब बटर सॉसची हलकी भुरळ घालण्यात आली होती. तर डेझर्टमध्ये गरम किंवा थंड प्रकारातील व्हेगन चीजकेक सादर करण्यात आले, ज्यावर काजूचे फिलिंग, प्रीमियम कोको चव व सिझनिंगसाठी बिस्किटाचा वापर करण्यात आला असून शेवटी व्हेगन काजू फिलिंगने त्याची आकर्षक मांडणी करण्यात आली.

या प्राथमिक फेरीसाठी परीक्षक म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नामवंत शेफ उपस्थित होते. यामध्ये वेस्टमिन्स्टर किंग्सवे कॉलेज, लंडन येथील हॉस्पिटॅलिटी आणि क्युलिनरी आर्ट्स स्कूलचे प्रमुख शेफ पॉल जर्विस; बुड्ल्स, लंडन येथील एक्झिक्युटिव्ह शेफ स्टीफन कार्टर; जागतिक पातळीवरील प्रसिद्ध पेस्ट्री तज्ज्ञ व कॅलेबॉ अँबॅसिडर शेफ सारा हार्टनेट; जुमेराह कार्लटन टॉवर, नाइट्सब्रिज येथील एक्झिक्युटिव्ह शेफ मारिओ परेरा; क्युलिनरी आणि जागतिक एफ अँड बी क्षेत्रातील द्रष्टे शेफ शॉन केनवर्थी; तसेच द फर्न हॉटेल अँड रिसॉर्ट्स (लंडन), कॉर्पोरेट एफ अँड बी चे शेफ रितेश सेन यांचा समावेश होता.

या प्रसंगी बोलताना इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (IIHM) चे अध्यक्ष तसेच वायसीओ (YCO ) चे अध्यक्ष डॉ. सुबोर्नो बोस यांनी सांगितले, "यंग शेफ ऑलिम्पियाड हा केवळ पाककलेशी संबंधित कार्यक्रम नाही, तर स्वयंपाकाच्या माध्यमातून राष्ट्रांना एकत्र आणणाऱ्या एकात्म शक्तीचा तो सशक्त प्रत्यय आहे. नवकल्पना, कौशल्य आणि सर्जनशीलतेच्या जोरावर तसेच पाककलेतील चव व स्वाद यांच्या समतोलातून तरुण शेफ्स उज्ज्वल उद्याची वाटचाल घडवतील, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे."

यंग शेफ ऑलिम्पियाड २०२६' अंतर्गत सहभागी स्पर्धक 'युनायटेड वर्ल्ड ऑफ यंग शेफ्स' (UWYC) या विशेष उपक्रमाचाही भाग होते. मैत्री, सौहार्द आणि ऐक्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमातून तीव्र स्पर्धेच्या वातावरणातही पाककलेच्या माध्यमातून एकोप्याचा अनुभव यंग शेफ ऑलिम्पियन्सना घेता आला. प्राथमिक फेरीच्या एक दिवस आधी पुणेसह विविध शहरांमध्ये UWYC चे आयोजन करण्यात आले होते. पुण्यात हा कार्यक्रम रॅडिसन ब्लू, पुणे खराडी येथे पार पडला.

यावेळी स्पर्धकांनी आपल्या देशांचे पारंपरिक व वैशिष्ट्यपूर्ण खाद्यपदार्थ सादर केले. इटालियन स्पॅघेटी बोलोनेझ, मलेशियन नासी लेमक, कॅनेडियन पुटीन, मेक्सिकन टॅकोज, सायप्रसचे सुव्लाकी, इजिप्शियन कोशारी, श्रीलंकन चिकन करी यांसह विविध देशांतील पदार्थांचा पाहुण्यांनी आस्वाद घेतला.

प्राथमिक फेरीच्या समाप्तीनंतर ४० देशांचे प्रतिनिधी अंतिम टप्प्यासाठी कोलकाता येथे रवाना होणार आहेत. ४ ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत IIHM च्या ग्लोबल कॅम्पस, कोलकाता येथे ऑलिम्पियाडचे सर्व महत्त्वाचे अंतिम कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यंग शेफ ऑलिम्पियाड २०२६ च्या भव्य अंतिम फेरीत अव्वल १० यंग शेफ ऑलिम्पियन्स आपले कौशल्य सादर करणार आहेत. यासोबतच 'प्लेट ट्रॉफी' आणि 'डॉ. सुबोर्नो बोस क्युलिनरी इंटरनॅशनल चॅलेंज' या मानाच्या पुरस्कारांसाठीही चुरस रंगणार आहे. या जागतिक व्यासपीठावरील ट्रॉफी तरुण शेफ्सच्या कारकिर्दीला नवी दिशा देणाऱ्या ठरणार असून त्यांच्या कौशल्याला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवून देणार आहेत. या कार्यक्रमाला रॅडिसन ब्लू पुणे खराडी, नोवोटेल विमान नगर, आयबिस विमान नगर, चुफांग एशियन किचन अँड बार आणि सांझ फॅमिली रेस्टॉरंट या नामांकित हॉस्पिटॅलिटी भागीदारांचे सहकार्य लाभले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### साताऱ्यात अजितदादांनी लावलेल्या झाडालाच अस्थींचे विसर्जन

सातारा (दैनिक संध्या) : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सातारा जिल्ह्याशी असलेले नाते हे केवळ राजकीय नसून ते कौटुंबिक आणि ऋणानुबंधाचे होते. याच अतूट नात्याची प्रचिती संगम माहुली येथील कैलास स्मशानभूमीत पाहायला मिळाली. कारण, अजित पवार यांच्या अस्थींचे विसर्जन त्यांनीच दोन वर्षांपूर्वी लावलेल्या वृक्षाच्या मुळापाशी करून बालाजी चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक-अध्यक्ष राजेंद्र चोरगे यांनी त्यांना आगळीवेगळी श्रद्धांजली वाहिली. अजित पवार २०२३ मध्ये जेव्हा साताऱ्यात आले होते, तेव्हा राजेंद्र चोरगे यांच्या संकल्पनेतून संगम माहुली येथे उभारण्यात आलेल्या कैलास स्मशानभूमीला त्यांनी भेट दिली होती. या परिसराच्या निर्मितीत अजित पवार यांचे मोठे योगदान होते. त्यावेळी पवार यांनी स्वतःच्या हातांनी येथे एका पिंपळ वृक्षाची लागवड केली होती. आज दोन वर्षांनंतर ते झाड डामडौलात उभे आहे; पण ते लावणारे हात मात्र आज काळाच्या पडद्याआड गेले आहेत. अजित पवार यांचा अस्थिकलश साताऱ्यात दर्शनासाठी आणला असता, तमाम सातारकरांनी जड अंतःकरणाने आपल्या नेत्याचे दर्शन घेतले. यावेळी राजेंद्र चोरगे यांनी एक भावनिक निर्णय घेतला. ज्या झाडाची लागवड खुद्द अजित पवार यांनी केली होती, त्याच झाडाच्या मुळापाशी त्यांच्या अस्थी विसर्जित करण्यात आल्या. याप्रसंगी बाळासाहेब सोळसकर, अमित कदम, राजेंद्र लवंगारे, संजय कदम, जगदीश खंडेलवाल यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कैलास स्मशानभूमीच्या निर्मितीपासून ते विकासापर्यंत अजित पवार यांनी दिलेले बळ सातारा कधीही विसरू शकणार नाही. आज जरी ते देहरूपाने आपल्यात नसले, तरी त्यांनी लावलेल्या या झाडात सातारकरांना त्यांचे अस्तित्व सदैव जाणवत राहील, अशा भावना व्यक्त करताना उपस्थितांचे डोळे अश्रूंनी पाणावले.

### राजेश टोपेंनी अजितदादांच्या अपघाताच्या वेळेबाबत दिले स्पष्टीकरण

सातारा (दैनिक संध्या) : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर राज्यात शोकाकुल वातावरण पसरले होते. दरम्यान, अपघातावरून उलट-सुलट चर्चा सुरू आहेत. माजी मंत्री राजेश टोपे यांनी अजित पवार यांच्या अपघाताच्या वेळेबाबत एक दावा केला होता. या अपघाताची माहिती साडे सात वाजता मला मिळाल्याचे टोपे यांनी सांगितले होते. आता टोपे यांनी वेळेबाबत स्पष्टीकरण दिले आहे. या दुःखद घटनेनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना निधनाची बातमी समजल्याच्या वेळेबाबत आपल्याकडून अनावधानाने चुकीचा उल्लेख झाल्याचे माजी मंत्री राजेश टोपे यांनी स्पष्ट केले आहे. याबाबत त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. "मा. अजितदादा यांचे अपघाती निधन हा आम्हा सर्वांसाठी खूप तीव्र धक्का होता. या दुःखद प्रसंगी प्रसारमाध्यमांशी बोलताना बातमी समजल्याच्या वेळेबाबत अनावधानाने माझ्याकडून चुकीचा उल्लेख झाला. कृपया, या कठीण व संवेदनशिल काळात ही बाब समजून घ्यावी, ही विनंती, असे टोपे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. दरम्यान, या अपघातावर अनेकांनी शंकाही व्यक्त केली असून चौकशी करण्याची मागणी केली आहे. राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी काही प्रश्न उपस्थित करत चौकशीची मागणी केली आहे.

### अमरावतीतील 'मनरेगा'ची चार हजार कामे बंद, 80 हजार मजुरांवर 'उपासमारी'

अमरावती (दैनिक संध्या) : 'मनरेगा' योजनेचे कर्मचारी २७ जानेवारीपासून संपावर गेले आहेत. त्यामुळे पाच दिवसांत जिल्ह्यातील ४०९७ कामे बंद पडली, याचा किमान ८० हजार मजुरांना फटका बसला. मेळघाटातील ३० हजारांवर मजुरांच्या होळीचा बेरंग होत आहे, तर सामाजिक वनीकरणातील रोपवाटिका, रोपलागवड आदी कामे ठप्प पडली आहेत. या संपामुळे रोजगार हमी योजनेची सर्व कामे सध्या बंद आहेत. फेब्रुवारी महिना सुरू झाल्याने शेतातील कामे कमी झाली आहेत. अशा वेळी मजूर मोठ्या आशेने रोहयोच्या कामांकडे वळतात. मात्र, कर्मचाऱ्यांच्या संपामुळे मस्टर काढण्यापासून ते मोजणीपर्यंतची सर्व कामे थांबली आहेत. शिवाय मजुरांची मस्टर प्रदाने सुद्धा प्रलंबित आहेत. चिखलदरा व धारणी तालुक्यांतील आदिवासी मजुरांना तातडीने मनरेगा योजनेचे काम उपलब्ध न झाल्यास स्थलांतर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, अशी स्थिती आहे.

## आकुर्डी, गंगानगरमध्ये वीजपुरवठा खंडित; नागरिकांचा संताप

आकुर्डी (दै. संध्या)

सातत्याने खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे गंगानगर, आकुर्डी गावठाण, दत्तवाडी, विठ्ठलवाडी परिसरात नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सततच्या बत्ती गुलमुळे विद्युत उपकरणे खराब होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे असून, त्यामुळे नागरिक संताप व्यक्त करत आहेत. गंगानगर भागामध्ये हनुमान मंदिर परिसरात अनेक वेळा खंडित वीजपुरवठा होत आहे. दुरुस्तीच्या नावाखाली सातत्याने कर्मचाऱ्यांकडून वीजपुरवठा खंडित करण्यात येतो. रात्री, अपरात्री, तसेच दिवसाही अनेक वेळा बत्ती गुलमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. आकुर्डी गावठाणातील हनुमान मंदिर परिसर, प्लाझा, गुरुदेवनगर, पंचतारानगर येथे सातत्याने वीज गायब होत आहे. किमान तीन ते चार तास वीजपुरवठा सुरळीत होत नाही. त्यामुळे गृहिणी, तसेच वर्क फ्रॉम होम काम करणारी आयटी कर्मचाऱ्यांची प्रचंड गैरसोय होत आहे. दत्तवाडी, विठ्ठलवाडी, श्रीकृष्ण नगर, विठ्ठल मंदिर, तसेच आकुर्डी मंडई परिसरामध्ये खंडित वीजपुरवठा नेहमीचीच समस्या ठरली आहे. नागरिकांनी महावितरणकडे तक्रारीसाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, कर्मचाऱ्यांकडून प्रतिसाद मिळत नाही. बत्ती गुलची समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

## ल्युकेमिया असलेल्या मुलाचे जीवन वाचवण्यासाठी आईने स्टेम सेल्स केले दान

मुंबई (दै. संध्या)

मुंबईतील नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन हॉस्पिटलने १२ वर्षीय प्रदीप कुमार (नाव बदलले आहे) वर यशस्वी उपचार केले आहेत, जो दुर्मिळ आणि अत्यंत आक्रमक प्रोग्रेसिव्ह ल्युकेमियाशी झुंजत होता. या उपचारात प्रगत आणि क्वचितच केले जाणारे टी-डिप्लेटेड हॅप्लोइडेंटिकल स्टेम सेल प्रत्यारोपण समाविष्ट होते, मुलाची आई अर्ध-मॅच्ड दाता म्हणून पुढे आली आणि तिच्या मुलाला जीवनाची एक नवीन संधी मिळाली.

बाळाला जवळजवळ तीन वर्षांपूर्वी सीएमएल (क्रॉनिक मायलोइड ल्युकेमिया) असल्याचे निदान झाले होते आणि तो लक्षित थेरपीवर होता. तथापि, कालांतराने त्याची प्रकृती बिघडली आणि हा आजार एएमएल (ॲक्यूट मायलोइड ल्युकेमिया) च्या ब्लास्ट क्रायसिस टप्प्यात गेला. हा ल्युकेमियाचा एक जीवघेणा प्रकार आहे ज्यासाठी त्वरित उपचार आणि हस्तक्षेप आवश्यक आहे. केमोथेरपीनंतर आणि कमीतकमी अवशिष्ट रोग नकारात्मकता प्राप्त केल्यानंतर, मुलाला बोन मॅरो ट्रान्सप्लांट (बीएमटी) साठी नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन हॉस्पिटल, मुंबई येथे रेफर करण्यात आले.

जुळणारा भाऊ किंवा बहीण दाता उपलब्ध नसल्याने, वैद्यकीय पथकाने त्याच्या आईचे संभाव्य दाता म्हणून मूल्यांकन केले. विशिष्ट KIR मिसॅमॅच विश्लेषणासह तपशीलवार सुसंगतता चाचणी केल्यानंतर, पथकाने हॅप्लोइडेंटिकल (अर्ध-जुळणारे) प्रत्यारोपण करण्याचा निर्णय घेतला आणि आईची दाता म्हणून निवड करण्यात आली. मुलाने टी-डिप्लेटेड हॅप्लोइडेंटिकल हेमॅटोपोएटिक स्टेम सेल प्रत्यारोपण (HSCT) केले, ही एक तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीची आणि संसाधन-केंद्रित प्रक्रिया आहे ज्यासाठी उच्च पातळीची कौशल्ये आणि प्रगत पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. मुलाने प्रत्यारोपण चांगले सहन केले आणि 42 दिवस BMT युनिटमध्ये राहिला. उल्लेखनीय म्हणजे, त्याला कोणतीही मोठी गुंतागुंत जाणवली नाही, प्रत्यारोपण यशस्वीरित्या उत्खनन झाले आणि 100 टक्के डोनर काइमेरिझम साध्य झाला.

आज, प्रत्यारोपणाच्या 18 महिन्यांनंतर, प्रदीप पूर्णपणे बरा झाला आहे. त्याला ग्राफ्ट-व्हर्सस-होस्ट रोग (GVHD) झालेला नाही किंवा सुप्त विषाणूचे पुनरुज्जीवन झालेले दिसून आले नाही. तो पूर्णपणे निरोगी आणि सक्रिय जीवन जगत आहे. तो सध्या टायरोसिन काइनेज इनहिबिटर औषध घेत आहे, जे त्याला पुढील सहा महिने घ्यावे लागेल, त्यानंतर तो सर्व औषधे बंद करेल.

या प्रकरणाबद्दल बोलताना, डॉ. प्रीती मेहता, वरिष्ठ सल्लागार - बालरोग ऑन्कोलॉजी, रक्तविज्ञान आणि बीएमटी, नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल, मुंबई म्हणाल्या, "ल्युकेमियाच्या ब्लास्ट क्रायसिस स्टेजमुळे हा एक अत्यंत उच्च-जोखीमीची केस होती. टी-डिप्लेटेड हॅप्लोइडेंटिकल ट्रान्सप्लांटसाठी अत्यंत काळजीपूर्वक निवड आणि उच्च-स्तरीय तज्ञांची आवश्यकता असते. मुलाची उत्कृष्ट पुनर्प्राप्ती आणि कायमस्वरूपी माफी हे दर्शवते की प्रगत प्रत्यारोपण तंत्रे मर्यादित इतर पर्याय असलेल्या मुलांसाठी देखील नवीन आशा देऊ शकतात."

## 'सीआयएसएफ' कडून रत्नागिरीत 'वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन–2026'चे आयोजन

### उपक्रमाचा आरंभ उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या हस्ते

मुंबई (दै. संध्या)



देशातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने (सीआयएसएफ) आपल्या 57 वर्षांच्या गौरवशाली सेवेचे औचित्य साधत 14 फेब्रुवारी 2026 रोजी रत्नागिरी येथील पोलीस मैदानावर 'वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन–2026' या उपक्रमाचे आयोजन केले आहे. या उपक्रमाचा आरंभ उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे.

या सायक्लोथॉनचा उद्देश किनारी व सागरी सुरक्षेबाबत जनजागृती, राष्ट्रीय एकात्मता, तंदुरुस्ती, पर्यावरण संवर्धन आणि महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणे हा आहे. विशेष बाब म्हणजे या मोहिमेत 50 टक्के महिला सहभागी आहेत.

या सायक्लोथॉनद्वारे किनारी भागातील नागरिकांमध्ये राष्ट्रीय सुरक्षेचे भान निर्माण करणे, नागरिक व 'सीआयएसएफ' यांच्यात समन्वय वाढवणे, तरुण पिढीला अमली पदार्थांच्या धोक्यांबाबत जागरूक करणे आणि बंदर सुरक्षेतील 'सीआयएसएफ'च्या 51 वर्षांच्या अनुभवाची माहिती देणे हा उद्देश आहे. 1969 मध्ये स्थापन झालेल्या 'सीआयएसएफ'ने गेल्या 57 वर्षांत रिफायनरीज, विमानतळ, बंदरे, मेट्रो रेल्वे, अणुऊर्जा प्रकल्प, अंतराळ केंद्रे यांसह देशाच्या अनेक सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या आस्थापनांची सुरक्षा सक्षमपणे सांभाळली आहे. सुरक्षेपुरतेच नव्हे तर जनजागृती, सामाजिक उपक्रम आणि सार्वजनिक सुरक्षिततेच्या कार्यक्रमांद्वारे सीआयएसएफ राष्ट्रीय सेवेची बांधिलकी जोपासत आहे.

'वंदे मातरम्' या देशभक्तीपर गीताच्या 150 वर्षांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या या कोस्टल सायक्लोथॉनमध्ये देशाच्या पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवरून तब्बल 6,600 किलोमीटरचा प्रवास करण्यात येणार असून, या उपक्रमाचा समारोप कोची येथे होणार आहे. मागील वर्षीच्या सायक्लोथॉन–2025 ला 30 लाखांहून अधिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता, तर 2.9 कोटी डिजिटल संवाद नोंदविण्यात आले होते.

सामाजिक सहभागाच्या माध्यमातून 52 किनारी गावांना 'तट प्रहरी' म्हणून दत्तक घेण्यात आले असून, त्या गावांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्यप्रयोग, वैद्यकीय सेवा, खुली व्यायामशाळा, क्रीडा सुविधा तसेच तस्करी व बेकायदेशीर घुसखोरी रोखण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

रत्नागिरी येथील पोलीस मैदानावर 14 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या या कार्यक्रमात 2019 मध्ये पुलवामामध्ये शहीद झालेल्या 40 सीआरपीएफ जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार असून रत्नागिरी जिल्ह्यातील चार शहीद जवानांच्या कुटुंबियांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. त्याचबरोबर जिल्हा सांस्कृतिक पथक, एनसीसीचे विद्यार्थी तसेच सीआयएसएफ पथकाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे.

## १२ महिन्यांत ९५% आरसी ट्रान्सफर

मुंबई (दै. संध्या)

■ 2025 मध्ये Spinny ने कार विक्रेत्यांच्या सुरक्षिततेसाठी बेंचमार्क सेट केला

संपूर्ण भारतात रस्ते सुरक्षा आणि कायदेशीर जबाबदारीवर लक्ष वाढत असल्यामुळे, वाहनांच्या मालकीसंबंधी कागदपत्रे हे यूज्ड-कारच्या खरेदी-विक्रीमध्ये महत्त्वाचे झाले आहेत. ग्राहक आता पारंपारिक अनौपचारिक रिसेल माध्यम आणि स्थानिक डीलर्सपासून दूर जात आहेत आणि त्याऐवजी अशा प्लॅटफॉर्मवर विश्वास ठेवत आहेत जे पारदर्शकता, सत्यापित कागदपत्रे आणि विश्वासार्ह परिणाम देतात. Spinny कडून आलेल्या नव्या आकडेवारीत हा बदल स्पष्ट दिसून येतो. या फुल-स्टॅक वापरलेल्या कार्सच्या प्लॅटफॉर्मने गेल्या 12 महिन्यांत 95% RC ट्रान्सफर पूर्ण करण्याचा दर साधला आहे, ज्यामुळे वाहन हँडओव्हर नंतर विक्रेत्यांमधील अनिश्चितता कमी झाली आहे.

Spinny ग्राहकांचा सतत विश्वास राखत 4.5-स्टार कस्टमर रेटिंग राखत आहे. Spinny ने खरेदीदारांकडे ज्या विश्वासार्हतेसाठी ओळख मिळवली आहे, तीच विक्रेत्यांकडेही विस्तारित केली आहे. Spinny चे विक्रेता धोरणे "ग्राहक प्रथम" या तत्त्वावर आधारित आहेत आणि वेळोवेळी टिकून राहतात.

बहुतेक प्रकरणांमध्ये, अंतिम पेमेंट मूळ ऑनलाइन अंदाजापेक्षा फक्त 3–4% अधिक किंवा कमी असते, ज्यामुळे विक्रेत्यांना सुरुवातीपासूनच स्पष्ट आणि विश्वासार्ह किंमत दिसते. हे इतर काही प्लॅटफॉर्म्समध्ये दिसणाऱ्या पद्धतींपासून वेगळे आणि विसंगत आहे. इतर काही प्लॅटफॉर्म्समध्ये आकर्षक ऑनलाइन कोट्स अनेकदा वाहन तपासणीनंतर मोठ्या प्रमाणावर बदलल्या जातात. असंघटित बाजारपेठांप्रमाणे, जिथे विक्रेत्यांना अपूर्ण आरसी ट्रान्सफरमुळे ट्रॅफिक चलान, गैरवापर किंवा कायदेशीर नोटिसांचा धोका असतो, Spinny प्रत्येक व्यवहार पूर्णपणे दस्तऐवजीकरण केलेला आणि MoRTH चे अनुपालन करणारा असल्याची खात्री करतो. आधार, पॅन, बँक तपशील आणि स्वाक्षरी केलेले करार यासारखे सर्व आवश्यक कागदपत्रे खरेदीदार आणि विक्रेते दोघांसाठी सत्यापित केली जातात आणि आरसी ट्रान्सफर सुरुवातीपासून शेवटपर्यंत डिजिटली ट्रॅक केले जातात.

## नेटबॉल स्पर्धा : खेळाडूंनी वाहिली अजितदादांना श्रद्धांजली

नांदेड (दै. संध्या)

■ महाराष्ट्र संघाने जिंकलेले सुवर्णपदक अजितदादा पवार यांना समर्पित



पुणे क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या मान्यतेने जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र नेटबॉल असोसिएशन आणि नांदेड जिल्हा नेटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२५–२६ या वर्षातील राष्ट्रीयस्तर शालेय नेटबॉल स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्या. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या तिन्ही वयोगटातील संघांनी दैदिप्यमान कामगिरी करत सुवर्णपदकांची कमाई केली. ही तिन्ही सुवर्णपदके दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली म्हणून समर्पित करण्यात आली.

दि. २७ जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत श्री गुरुग्रंथ साहिब भवन मैदान, गुरुद्वारा परिसर येथे स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. देशभरातून आलेल्या शालेय संघांनी खेळातील शिस्त, संघभावना आणि कौशल्याचा उत्कृष्ट प्रत्यय दिला.

निकालांची झलक

१४ वर्षे मुले : प्रथम – महाराष्ट्र | द्वितीय – मध्यप्रदेश | तृतीय – विद्याभारती

१४ वर्षे मुली : प्रथम – महाराष्ट्र | द्वितीय – कर्नाटक | तृतीय – हरियाणा

१७ वर्षे मुली : प्रथम – महाराष्ट्र | द्वितीय – राजस्थान | तृतीय – गुजरात

१४ वर्षे मुले : कार्तिक वाघ, निखिल राजपूत, यश पांडे, राज वाघ, साहिल मुलानी, साई गजभारे, अनमोल जाधव, विरोचन शिंदे, अनिरुद्ध लंगोटे, आयुष येरणे, धनुष झावरे.


१४ वर्षे मुली : भावना गावडे, सृष्टी गायकवाड, वेदिका तनपुरे, मोहिनी पडोळे, नंदिनी जगदेवे, अनुष्का गायकवाड, गीता कांबळे, ऋतुजा वाघ, समृद्धी पवार, दुना दापले, रोशनी बनसोडे, रक्षिता बकवाड.

१७ वर्षे मुली : अक्षता कोकणे, विशालाक्षी राठी, नेत्रा कांसरा, अनुष्का चामलाटे, पूर्वश्री वाघ, सई इजाते, कविता नाईक, कुशो हलमारे, अचिनी तांबारे, जिज्ञासा चौहाण, जान्हवी आघाव, ईशा पाटील.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोंटीसिंग होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी (नांदेड), एस.जी.एफ.आय. निरीक्षक जयकुमार टेंभरे, महाराष्ट्र नेटबॉल संघटना अध्यक्ष सतिश इंगळे, तालुका क्रीडा अधिकारी विजय काकडे, नांदेड जिल्हा नेटबॉल असोसिएशनचे सचिव प्रवीण कुपटीकर, एस.जी.एफ.आय. क्षेत्र अधिकारी प्रीती यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील मान्यवर व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेच्या समारोपावेळी खेळाडूंनी जिंकलेली सुवर्णपदके दिवंगत अजितदादा पवार यांना समर्पित करत त्यांच्या क्रीडाप्रेमी कार्याची आठवण जागवली. "खेळातून शिस्त, एकजूट आणि राष्ट्रनिर्मितीची ऊर्जा मिळते," असा संदेश या भावनिक क्षणातून देण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सोमेश्वर मंदिर परिसरात विशेष स्वच्छता अभियानाचे आयोजन : नगरसेवक सनी निम्हण

पुणे (दैनिक संध्या) : महाशिवरात्रीच्या पवित्र पर्वाच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही लाखो भाविक दर्शनासाठी येण्याची अपेक्षा आहे. या भाविकांना स्वच्छ, सुरक्षित व भक्तीमय वातावरण उपलब्ध व्हावे या उद्देशाने श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर परिसरात विशेष स्वच्छता व साफसफाई अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. हे स्वच्छता अभियान रविवार, दि. ०८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.०० वाजता श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर, पुणे येथे पार पडणार आहे. या उपक्रमाचे आयोजन श्रीक्षेत्र सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट यांच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमाबाबत माहिती देताना श्री. सनी विनायक निम्हण (विश्वस्त, श्रीक्षेत्र सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट तसेच नगरसेवक, पुणे महानगरपालिका) यांनी सांगितले की, महाशिवरात्री निमित्त मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असते. भाविकांना स्वच्छ व पवित्र वातावरणात दर्शन घेता यावे, तसेच आरोग्यदायी आणि सुरक्षित परिसर उपलब्ध व्हावा, हा या स्वच्छता अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या अभियानात नागरिकांनी, शिवभक्तांनी तसेच स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. सामूहिक सहभागातून मंदिर परिसर अधिक स्वच्छ, सुंदर आणि भक्तिमय करण्याचा संकल्प या उपक्रमातून साकार होणार आहे.

### अध्यक्षपदी ॲड. काळुराम भुजबळ; उपाध्यक्ष पदी ॲड. कांताराम नप्ते, ॲड. प्रतापराव मोरे



पुणे (दैनिक संध्या) : वकिलांची शिखर संघटना असलेल्या पुणे बार असोसिएशनच्या (पीबीए) अध्यक्षपदासाठी झालेल्या तिरंगी व चुरशीच्या लढतीत ॲड. काळुराम भुजबळ यांनी विजय मिळविला. त्यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार ॲड. विशाल शिवले यांचा ५९७ मतांनी पराभव केला. ॲड. भुजबळ यांना तीन हजार ८०७ मते मिळाली. बुधवारी (ता. ४) मतदार झाल्यानंतर गुरुवारी (ता.५) दुपारी एकपर्यंत मतमोजणीचा कार्यक्रम पार पडल्यानंतर निकाल जाहीर करण्यात आला. यंदाच्या निवडणुकीत अभूतपूर्व गोंधळ पाहायला मिळाला, अशी भावना मतदार वकील व्यक्त करत आहे. उपाध्यक्ष पदाच्या दोन जागांसाठी झालेल्या तिरंगी लढतीत ॲड. कांताराम नप्ते हे ३ हजार ६१९ मते तर ॲड. प्रतापराव मोरे हे 2 हजार ७०६ मते घेऊन विजयी झाले. महिला राखीव गटातून ॲड. प्रितीसिंह परदेशी यांनी ३ हजार ४७ मते मिळवीत विजय मिळवला. सचिव पदाच्या दोन जागांसाठी ॲड. सम्राट जांभूळकर आणि ॲड. अभिजित पोळ हे विजयी झाले. त्यांना अनुक्रमे ४ हजार २७२ आणि ३ हजार ३४४ मते मिळाली. महिला राखीव गटातून ॲड. पूजा पवार यांनी ३ हजार ८७६ मते मिळवीत विजय संपादन केला. खजिनदारपदासाठी झालेल्या लढतीत ॲड. अंजली बांदल यांनी वर्चस्व राखत ५ हजार २७४ मते मिळविली. ऑडिटर पदासाठी झालेल्या लढतीत ॲड. शिवराज निंबाळकर यांना ५ हजार २९० मते मिळाली. तर महिला गटातून ॲड. नेहा जांभळे यांनी ४ हजार ४ मते मिळवली. कार्यकारिणी सदस्यपदी सर्वसाधारण गटातून मयूर मराठे, विकास जाधव, उमेश मांजरे, प्रीतेश दळवी, योगेश जैन, अनिल हुडे, अमोल वडगणे, उदय शेलार प्रज्वल गुंजाळ आणि आकाश भिलारे यांची निवड झाली आहे. तर, महिला राखीव गटातून संध्या रायबोले, शीतल देशमुख, गुंजन भोसले, स्मिता वाघमारे आणि प्रियांका घाडगे यांची यापूर्वीच सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.



### जेजुरीच्या क-हा नदीमध्ये स्व. अजितदादा पवार यांच्या अस्थींचे विसर्जन

- जेजुरीकरांच्या अश्रूंचा बांध फुटला
- नगरपालिकेतील सभागृहाला दादांचे नाव देणार -नगराध्यक्ष जयदीप बारभाई

जेजुरी (दै. संध्या)

स्व.अजितदादा पवार यांच्या अस्थींकलशाचे गुरुवारी (दि.५) दुपारी २वाजता जेजुरी नगरीमध्ये एका रथातुन आगमन होताच जेजुरीकरांच्या अश्रूंचा बांध फुटला . अमर रहे अमर रहे अजितदादा अमर रहे, परत या परत या अजितदादा परत या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला .त्यांच्या अस्थी कलशावर पुष्पवृष्टी करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. नगरपालिका प्रांगणात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिलीपदादा बारभाई, नगराध्यक्ष जयदीप बारभाई, उपनगराध्यक्ष गणेश निकुडे, माजी नगराध्यक्ष रोहिदास कुंभार, जेष्ठ जालिंदर कामठे, वामन तात्या जगताप सर्व नगरसेवक, नगरसेविका, राष्ट्रवादी शहराध्यक्ष रमेश लेंडे, शिवसेना शहराध्यक्ष विठ्ठल सोनवणे, सर्वपक्षीय कार्यकर्ते, पदाधिकारी पत्रकार यांनी अस्थीकलशाचे दर्शन घेत श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर अस्थीकलश असलेला रथ छत्रपती शिवाजी महाराज चौकात दर्शनासाठी ठेवण्यात आला होता.

सायंकाळी ५ वाजण्याचे सुमारास पवित्र क-हा नदीतीरा वरील मल्हार सागर जलाशयात विधिवत अस्थी विसर्जन करण्यात आले. नगरपालिका निवडणुकीत स्व.अजितदादांनी मला पक्षाची उमेदवारी देऊन सर्वतोपरी बळ दिले .नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीला जेजुरीत प्रचारसभा घेत सत्ता द्या, निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन दिले होते योगायोगाने प्रचार सभेचा दिवस गुरुवार होता .दुर्दैवाने आज अस्थी जेजुरीत येण्याचा वार गुरुवारच आहे. आमचा राजकीय आधारवड हरपला आहे.

पुढील काळात स्व.दादांच्या आचार -विचारांचा वारसा जपण्याचा आमचा प्रयत्न राहील तसेच नगरपरिषदेतील सभागृहाला दादांचे नाव देणार असल्याचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई व रोहिदास कुंभार यांनी सांगितले.

## शहरी विकासाच्या पुढील टप्प्यासाठी महाराष्ट्राचे रिअल इस्टेट क्षेत्र सज्ज

पुणे (दै. संध्या)




- राष्ट्रीय शहरी आणि रिअल इस्टेट विकास परिषदेत नारेडको करणार प्रतिनिधित्व

महाराष्ट्राचे रिअल इस्टेट क्षेत्र राज्याच्या शहरी विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असून मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांचा विकास, दृढ औद्योगिक आणि व्यावसायिक गतिविधी आणि विस्तारणाऱ्या महानगरीय प्रदेशांचा त्याला आधार मिळत आहे. भारतातील सर्वाधिक शहरीकरण झालेल्या राज्यांपैकी एक असलेले महाराष्ट्र आपला शहरी विकास प्रवास आणि भविष्यातील प्राधान्यक्रम सादर करण्यासाठी सज्ज असून राष्ट्रीय शहरी आणि रिअल इस्टेट विकास परिषदेत राज्याचे प्रतिनिधित्व नारेडको (NAREDCO) करत आहे. नवी दिल्लीतील यशोभूमी येथे १३-१४ फेब्रुवारी २०२६ रोजी होणारी ही परिषद सर्व राज्यांना त्यांचे विकासाचे अनुभव आणि भविष्यातील रोडमॅप शेअर करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देईल. मुंबई महानगर प्रदेश, पुणे, नागपूर, नाशिक आणि इतर उदयोन्मुख शहरी केंद्रे यांसारख्या प्रदेशांमध्ये शहरी पायाभूत सुविधा मजबूत करण्याच्या, घरांचा पुरवठा सुधारण्याच्या आणि शाश्वत शहर विकासाला आधार देण्याच्या त्याच्या चालू प्रयत्नांवर प्रकाश पडेल. ट्रान्झिट-केंद्रित विकास, मोठ्या प्रमाणातील पुनर्विकास प्रकल्प, रेंटल हाऊसिंगशी संबंधित उपक्रम, निवासी, व्यावसायिक आणि मिश्र-वापर विकासाचे संतुलित मिश्रण यावर महाराष्ट्र देत असलेला भर या सहभागातून अधोरेखित होईल. व्यवसाय सुलभता (ईज ऑफ डुइंग बिझिनेस), पायाभूत सुविधांवर आधारित विस्तार आणि तंत्रज्ञान-केंद्रित शहरी नियोजन यांवर राज्याचा असलेला भर देशभरातील उद्योगातील भागधारकांसमोर यावेळी सादर केला जाईल. या परिषदेत वरिष्ठ धोरणकर्ते, सरकारी अधिकारी, आघाडीचे विकासक, वित्तीय संस्था, गुंतवणूकदार, शहरी नियोजनकर्ते आणि उद्योगतज्ज्ञ एकत्र येऊन भारताच्या रिअल इस्टेट आणि शहरी विकासाच्या भविष्यावर चर्चा करतील.



## लोकनेते अजितदादा पवार यांच्या
# अस्थिकलशाचे सासवडमध्ये भावपूर्ण दर्शन

सासवड (दै. संध्या)

लोकनेते दिवंगत उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे दर्शन सासवडकर नागरिकांनी घेतले. गुरुवारी सकाळी येथील ऐतिहासिक शिवतीर्थावर हा अस्थिकलश दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. यावेळी हजारो सासवडकरांनी आपल्या लाडक्या 'दादां'च्या आठवणींना उजाळा देत साश्रू नयनांनी त्यांना अखेरचा प्रणाम केला.

सकाळी अस्थिकलश शिवतीर्थावर दाखल होताच वातावरण अत्यंत भावूक झाले होते. आपल्या कामाचा धडाका आणि स्पष्टवक्तेपणामुळे लोकांच्या मनात घर केलेल्या नेत्याला निरोप देण्यासाठी समाजातील सर्व स्तरांतील लोकांनी गर्दी केली होती. विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या डोळ्यांत आपल्या हक्काच्या माणसाला गमावल्याचे दुःख स्पष्टपणे जाणवत होते. शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून या लोकनेत्याला पुष्पांजली अर्पण केली. याप्रसंगी नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष जालिंदर कामठे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, राष्ट्रवादीचे पुरंदर-हवेली विधानसभा अध्यक्ष वामनराव जगताप, माजी नगराध्यक्ष दत्तानाना जगताप, ॲड. कला फडतरे, माजी उपनगराध्यक्ष संजय ग. जगताप, सोमेश्वरचे माजी संचालक अरुण जगताप, शामकांत भिंताडे, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, प्राचार्य डॉ. पंडित शेळके, उमेश जगताप, भानूकाका जगताप, बंडूकाका जगताप, महेश जगताप, नवनाथ बोरावके, सयाजी वांढेकर, राजेंद्र गिरमे, ज्ञानेश्वर जगताप, डॉ. राजेश दळवी, अनिल जगताप यांसह अनेक मान्यवर, पदाधिकारी आणि अजितदादा प्रेमी उपस्थित होते.

सासवड आणि पुरंदर तालुक्याच्या सर्वांगीण विकासात अजितदादांचे योगदान मोलाचे राहिले आहे. तालुक्यातील सिंचन योजनांपासून ते शहराच्या नागरी सुविधांपर्यंत दादांनी नेहमीच विशेष लक्ष दिले होते. "आज आमचा खऱ्या अर्थाने आधारवड गेला," अशी भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. या दुःखद प्रसंगी माजी नगरसेवक राजेंद्र गिरमे आणि ज्ञा. कृ. जगताप यांनी उपस्थित नागरिकांसाठी 'दुखवट्याचा चहा' वाटप करून सांत्वन केले.

## पुण्यामध्ये मानसिक आरोग्य सेवेला मागणी : स्थानिक नमुने समोर

पुणे (दै. संध्या)



पुण्यातील मानसिक आरोग्याच्या समस्यांमध्ये एकट्यादुकट्या किंवा छोट्या घटनांपेक्षा सततचा ताण, चिंता आणि भावनिक त्रास यांचे प्रतिबिंब पडले आहे. आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापक आणि अध्यक्षा श्रीमती नीरजा बिर्ला यांच्या नेतृत्वाखालील एम्पॉवर या उपक्रमाच्या अंतर्गत मानसिक आरोग्य ट्रेंड्समध्ये ही माहिती समोर आली आहे. एम्पॉवरने केलेल्या एका विशेष शहरकेंद्रित मानसिक आरोग्य अभ्यासातून दिसून आले आहे, की पुण्यातील पाचपैकी चार रहिवासी कोणत्या ना कोणत्या मानसिक आरोग्य समस्यांनी ग्रस्त आहेत. यामध्ये - विशेषतः तरुण आणि किशोरांमध्ये - प्रचलित चिंता, घाबरण्याची लक्षणे आणि नैराश्य यांचा समावेश आहे. स्थानिक हेल्पलाइनच्या डेटानुसार, पुण्यामध्ये नातेसंबंधातील आव्हाने (३२ टक्के) आणि चिंता (२६ टक्के) या मुद्द्यांचा क्रमांक सर्वांत वर लागतो. बहुतांशी वेळेस शहरातील वेगवान जीवनशैली, तीव्र शैक्षणिक वातावरण आणि व्यावसायिक स्पर्धा यांच्याशी त्यांचा संबंध असतो. स्थानिक मानसिक आरोग्य तज्ज्ञांच्या मते हे भावनिक त्रास वाढवणारे घटक आहेत. "पुण्यातील मानसिक आरोग्याची आव्हाने ही एकटीदुकटी नाहीत," असे द एम्पॉवर सेंटरच्या पुणे येथील मानसोपचारतज्ज्ञ डॉ. स्नेहा आर्य म्हणाल्या. "नातेसंबंधांमधील ताणापासून ते काम आणि शैक्षणिक ताणापर्यंत, सार्वत्रिक शहरी दबाव आणि पुण्यातील अनोखी सामुदायिक गतिशीलता यांचे प्रतिबंब या प्रवाहांमध्ये पडले आहे."

एम्पॉवरच्या कार्यक्रमाच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की सर्व वयोगटांतील लोकांना मदत हवी आहे. पश्चिम विभागात (पुणे आणि मुंबईसह), जवळजवळ ३९ लाख लाभार्थींपर्यंत (३,८८८,३१२) मदत पोहोचली, यामध्ये १८-२५ वर्षे वयोगटातील आणि २६-४९ वयोगटातील प्रौढांचा अर्थपूर्ण सहभाग होता आणि किशोरवयीन मुले (०-१७) हा एकंदरीत सर्वात मोठा वयोगट होता.

## भरिताचं काळं वांग ठरलं सोनवणे कुटुंबीयांसाठी ‘सोनं’

भोर(दै. संध्या)

न्हावी सर्वे नंबर १५ (ता. भोर) येथील शेतकरी राजेंद्र महादेव सोनवणे यांनी एक एकरमध्ये काळ्या वांग्याचे (भरीत वांगे) ३० टन उत्पादन घेतले व १० लाखांचा नफा मिळवला. सोनवणे वांग्याचे हे पीक तीन वर्षांपासून घेत आहेत. यंदा त्यांना विक्रमी नफा असून गेल्या चार महिन्यांपासून त्यांनी ३० टन वांग्यांची विक्री केलेली आहे. आजपर्यंत यांना १० लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. वांग्यामुळे भरभराट झाल्याची भावना सोनवणे कुटुंबीयांनी व्यक्त केली आहे. राजेंद्र सोनवणे यांनी इंझा कंपनीचे बारटोक जातीचे वांग्याचे बियाणे विकत घेतले. १ हजार बियाणे असलेली एक पुडी साडेचार हजार रुपयांना खरेदी केली. एकूण तीन पुड्यांमधील तीन हजार बियाणांसाठी सुमारे १५ हजार रुपये खर्च केला. नर्सरीमध्ये या बियाणांपासून रोपे बनविण्यासाठी आणि वाढविण्यासाठी प्रत्येक रोपासाठी एक रुपया २० पैसे दिले. औषध फवारणीसाठी इकोला ॲग्रो कंपनीचे अर्जुन शिंदे यांनी सहकार्य केले. बियाणांच्या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी शेतावर येऊन पाहणी केली. ऑक्टोबर ते जानेवारी या चार महिन्यांत आतापर्यंत वांग्याचे १६ तोडे झाले आहेत. आतापर्यंत ३० टन वांग्याचे उत्पादन झालेले आहे.

## बारामती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी शिरीष कुलकर्णी

बारामती (दै. संध्या)

बारामती येथील दि बारामती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी ॲड. शिरीष दत्तात्रेय कुलकर्णी यांची, तर व्यवस्थापन मंडळात रिक्त झालेल्या कुलकर्णी यांच्या जागेवर उद्धव सोपानराव गावडे यांची व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. बँकेच्या गुरुवारी (ता. ५) झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. बारामती सहकारी बँक विश्वासाचा वारसा जपणारी बँक असून, बँकेच्या वाटचालीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विचार व योगदान मार्गदर्शक ठरले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बँक आगामी काळात प्रगती करत राहील, असा विश्वास नवनिर्वाचित अध्यक्षांनी व्यक्त केला. यावेळी बँकेचे माजी अध्यक्ष सचिन सातव, उपाध्यक्ष नूपुर शहा (वडूजकर), तज्ज्ञ संचालक प्रीतम पहाडे, संचालक रोहित घनवट, किशोर मेहता, विजय गालिंदे, देवेंद्र शिर्के, उद्धव गावडे, नामदेवराव तुपे, जयंत किकले, रणजित धुमाळ, मंदार सिकची, डॉ. सौरभ मुथा, संचालिका डॉ. वंदना पोतेकर, कल्पना शिंदे, तज्ज्ञ संचालक ॲड. रमेश गानबोटे, व्यवस्थापन मंडळ सदस्य ओंकार देवळे, कार्यकारी संचालक विनोद रावळ व मुख्यालयातील अधिकारी उपस्थित होते. बँकेकडे आजअखेर २२२२ कोटींच्या ठेवी असून, १३७४ कोटींचे कर्जवाटप केले आहे. ९८० कोटींची गुंतवणूक असून, बँकेचा निव्वळ एनपीए २.५८ टक्के आहे. भांडवल पर्याप्तता प्रमाण १६.७३ टक्के असून, बँकेच्या पुणे, सातारा, सोलापूर, अहमदनगर, नाशिक व रायगड या सहा जिल्ह्यांत ३६ शाखा आणि एक विस्तारित कक्ष कार्यरत आहे.

## “कॉफी विथ यशोमतीताई” कार्यक्रमाचे दुसरे सत्र उत्साहात पार

पुणे (दै. संध्या)




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात “कॉफी विथ यशोमतीताई” या संवादात्मक कार्यक्रमाचे दुसरे सत्र उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आणि उपस्थितांनी माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्याशी थेट संवाद साधत विविध सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक प्रश्नांवर चर्चा केली.

कार्यक्रमाचा उद्देश नेते आणि सामान्य नागरिक यांच्यातील अंतर कमी करणे हा होता. अमेरिकन “लूक-अलाइक” सिद्धांताचा संदर्भ देत, लोकांसारखे वागून, त्यांच्यात मिसळूनच नेतृत्वाला लोकांचा स्वीकार मिळतो आणि त्यातून विचारांचाही स्वीकार होतो, अशी भूमिका या संवादातून मांडण्यात आली. यशोमती ठाकूर यांच्या प्रत्येक उत्तराला मिळणाऱ्या टाळ्यांनी त्यांना मिळणारा जनसमर्थनाचा प्रत्यय दिला.

विद्यार्थ्यांनी पक्षांवर टीका करणारे प्रश्नही विचारले. त्यावर शांतपणे आणि हसत उत्तर देताना ठाकूर म्हणाल्या की, लोक बोलतात कारण त्यांना अपेक्षा असतात आणि तेच लोकशाहीचे लक्षण आहे. धार्मिक ध्रुवीकरणाच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी स्पष्टपणे सांगितले, “तिरंगा हाच आपला धर्म आहे — असं समजायचं आणि कामाला लागायचं.”

यूजीसी विधेयकासंदर्भातील प्रश्नावर उत्तर देताना त्यांनी, “निळ्यावर आणि तिरंग्यावर प्रेम करणारे आपणच आता हा देश वाचवू शकतो,” असे ठामपणे मत व्यक्त केले. या वक्तव्याला उपस्थितांकडून जोरदार प्रतिसाद मिळाला.

आंबेडकरवाद, समाजकारण आणि राजकारण या विषयांवर चर्चा रंगली असताना त्यांनी सामाजिक न्याय, समता आणि संविधानिक मूल्यांच्या जपणुकीचा वारसा काँग्रेसकडे असल्याचे सांगितले. तसेच एनएसयूआय आणि युवक काँग्रेस कार्यकर्त्यांना निवडणुकीत संधी न मिळण्याच्या प्रश्नावर बोलताना, “तुम्हाला संधी मिळत नसेल, तर ती तुम्हालाच हिसकावून घ्यावी लागते,” असा संघर्षाचा संदेश त्यांनी दिला.

हा कार्यक्रम केवळ संवादापुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांसाठी आत्मसन्मान, संघर्ष आणि लोकशाही मूल्यांची जाणीव करून देणारा ठरला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना निर्भीडपणे उत्तर देत संवादावर आणि लोकशाहीवर आमचा विश्वास असल्याचे यशोमती ठाकूर यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी त्यांचे आभार मानत घोषणाबाजी केली. जय भीम, जय शिवराय, जय संविधानच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

# ‘व्हाईटकोट सेलिब्रिटी क्रिकेट लीग २०२६’ची घोषणा

पुणे (दै. संध्या)



भारतातील पहिली डॉक्टर-सेलिब्रिटी टी-20 लेदर बॉल क्रिकेट लीग असलेल्या व्हाईटकोट सेलिब्रिटी क्रिकेट लीग (WCCL) 2026 ची अधिकृत घोषणा आज करण्यात आली. “जिथे आरोग्यसेवा, क्रिकेट आणि ग्लॅमर एकत्र येतात” या संकल्पनेवर आधारित ही अनोखी लीग डॉक्टरांच्या कर्तृत्वाला सन्मान देतानाच दर्जेदार क्रिकेट मनोरंजन देणार आहे अशी माहिती या लीगचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक सचिन वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी सीए अखिल कुमार, दीपेश शेरे (WCCL ऑपरेशन्स आणि मार्केटिंग) उपस्थित होते. पुढे बोलताना सचिन वाघमारे म्हणाले, ही भारतातील पहिली अशी लीग आहे, जिथे देशभरातील डॉक्टर आणि नामवंत सेलिब्रिटी एकाच व्यासपीठावर खेळताना दिसतील. WCCL ट्रायल्सला देशभरातून 5,000 हून अधिक डॉक्टरांनी नोंदणी केली असून, भारतात प्रथमच आयोजित होत असलेल्या डॉक्टरांच्या व्यावसायिक क्रिकेट लीगसाठी देशभरात ग्राउंड ट्रायल्स पूर्ण झाल्या असून निवड प्रक्रिया सुरू आहे. पुणे, मुंबई, अहमदाबादसह विविध शहरांमध्ये मोठ्या उत्साहात चाचण्या घेतल्या जात आहेत. या लीगमध्ये 10 डॉक्टर-नेतृत्वाखालील संघ असतील. प्रत्येक संघात 1 ते 2 सेलिब्रिटी खेळाडू सहभागी होतील. पुण्यात राऊंड-रॉबिन पद्धतीने लीग सामने खेळवले जातील, तर उपांत्य फेरी आणि अंतिम सामना देशाच्या बाहेर होणार आहे. 200 ते 500 निवडक डॉक्टरांचा भव्य लिलाव (ग्रँड ऑक्शन) पुण्यात पार पडणार असून तो थेट प्रक्षेपित केला जाईल. या लीगमध्ये केवळ भारतीय डॉक्टरच नव्हे तर यूकेसह परदेशातील डॉक्टरही सहभागी होत आहेत. शहरी भागासोबतच ग्रामीण व खेडेगावातील डॉक्टर-खेळाडूंनी मोठ्या संख्येने नोंदणी केली आहे. तसेच लीगमध्ये अभिनेता सिद्धार्थ जाधव, संजय जाधव, प्रवीण तरडे यांसह अनेक नामवंत कलाकार सहभागी होणार आहेत. ‘व्हाईटकोट सेलिब्रिटी क्रिकेट लीग 2026’ची प्राथमिक फेरी 4 ते 8 मे 2026 दरम्यान दोन गटात साखळी सामन्याने होणार आहे. हे सामने पुण्यात तर सेमी फायनल आणि फायनल सामने दुबई येथे खेळविण्यात येणार आहेत. डॉक्टर्सना त्यांच्या वैद्यकीय सेवेपलीकडे जाऊन वेगळ्या स्वरूपात सन्मान या लीग च्या माध्यमातून होणार आहे. डॉक्टर खेळाडू इतर कोणत्याही IPL क्रिकेटपटूपेक्षा कमी नाहीत. त्यांच्या कौशल्य, शिस्त आणि जिद्दीमुळे ही लीग देशातील क्रीडा विश्वात नवा इतिहास घडवेल, असे आयोजकांनी स्पष्ट केले. सध्या मुंबई मेडस्टार्स, पुणे, अहमदाबाद, चेन्नई, पंजाब, दिल्ली, बेंगळुरू, हैदराबाद, जयपूर आणि कोलकाता या शहरांच्या नावाने संघ तयार करण्यात येत आहेत. काही संघांच्या स्लॉट्स अद्याप खुले असून, इच्छुक गुंतवणूकदार व संघमालकांनी आयोजकांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.